




# दैनिक युवावार्ता

परिवर्तनाचा पुरस्कर्ता

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

तिकीट न लावण्याचा पोष्ट परवाना : WPP - 264 ◆ RNI No. MAHMAR/2007/24252 ◆ पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2023-25








वर्ष १९ वे । अहिल्यानगर । अंक १०१ । किंमत - ४ रू संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) रविवार । २६/०४/२०२६ । पाने - ६







## फडणवीस - ठाकरेंमध्ये वर्षावर रात्री गुफ्तगू, राजकीय चर्चेला उधाण



मुंबई (वृत्तसंस्था)
राज्यातील राजकारणाला नवा कलाटणी देणारी एक मोठी चर्चा सध्या जोर धरताना दिसत आहे. उद्धव ठाकरे यांनी मध्यरात्री देवेंद्र फडणवीस यांची वर्षा या अधिकृत निवासस्थानी भेट घेतल्याचा दावा समोर आला आहे. या दाव्यामुळे राजकीय वर्तुळात एकच खळबळ उडाली असून आगामी विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर या भेटीचे महत्त्व अधिक वाढले आहे. नेमकी ही भेट का झाली, याबाबत अधिकृत माहिती समोर नसली तरी अनेक तर्क-वितर्कांना उधाण आले आहे.

ही चर्चा एका ट्विटमुळे पेटली आहे. प्रबुद्ध भारत या माध्यम संस्थेने सूत्रांच्या आधारे केलेल्या दाव्यानुसार, ठाकरे आणि फडणवीस यांच्यात मध्यरात्री भेट झाली. मात्र, या भेटीचे स्वरूप, कालावधी किंवा चर्चेचे विषय याबाबत कोणतीही ठोस माहिती समोर आलेली नाही. तरीही, हा दावा समोर आल्यानंतर राज्यातील राजकीय वातावरणात अस्वस्थता निर्माण झाली आहे.


(पान ५)

### माहिती फक्त ठाकरे आणि फडणवीसांकडेच - संजय राऊत

**या सर्व चर्चादरम्यान, शिवसेना नेते संजय राऊत यांनीही प्रतिक्रिया दिली आहे. त्यांनी स्पष्ट केले की, या भेटीबाबत नेमकी माहिती फक्त ठाकरे आणि फडणवीस यांच्याकडेच आहे. त्यामुळे अफवांवर विश्वास ठेवण्याऐवजी अधिकृत स्पष्टीकरणाची प्रतीक्षा करणे गरजेचे आहे. सध्या तरी या भेटीचा अधिकृत तपशील समोर आलेला नसला, तरी या एका ट्विटने राज्याच्या राजकारणात मोठी खळबळ उडवली आहे. आगामी काळात या भेटीचे खरे स्वरूप स्पष्ट होईल का आणि त्यातून कोणते नवे राजकीय समीकरण तयार होईल, याकडे संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे.**

## 'शिवाजी कोण होता' पुस्तकाचे रविवारी सामूहिक वाचन

### शिंदे सेनेचे आ. गायकवाड यांच्या शिवराळ भाषेच्या निषेधार्थ आंदोलन




युवावार्ता (प्रतिनिधी)
संगमनेर - हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज संपूर्ण जगाचे आराध्य दैवत आहे. सर्व समाजाला बरोबर घेऊन त्यांनी स्वराज्य निर्माण केले. संगमनेर मधील सर्व राजकीय पक्ष व पुरोगामी संघटना यांच्या वतीने रविवार दिनांक २६ मार्च २०२६ रोजी सकाळी ८ ते १० या वेळेत नेहरू गार्डन संगमनेर येथे कॉम्रेड गोविंद पानसरे लिखित शिवाजी कोण होता या पुस्तकाचे सामूहिक वाचन करण्यात येणार आहे. यानंतर छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला अभिवादन करण्यात येणार आहे.

छत्रपती शिवाजी महाराज यांनी १८ पगड समाजातील सर्वांना बरोबर घेऊन स्वराज्य निर्माण केले. त्यांच्या मावळ्यांमध्ये विविध जाती धर्मातील व मुस्लिम समाजातील अनेक कर्तबगार पुरुष होते. या सर्वांची माहिती असणारे व कॉम्रेड गोविंद पानसरे यांनी लिहिलेले शिवाजी कोण होता? हे पुस्तक महाराष्ट्रात लोकप्रिय आहे. मात्र अपूर्ण माहितीच्या आधारे शिंदे सेनेचे आमदार संजय गायकवाड यांनी या पुस्तकाबाबत वाद निर्माण केला असून प्रकाशकाला अत्यंत घाणेरडी भाषा वापरली आहे. यामुळे महाराष्ट्रात आणि समाजात त्यांच्याविषयी मोठा असंतोष निर्माण झाला आहे.

समाजामध्ये तेढ निर्माण करणाऱ्या संजय गायकवाड यांनी केलेल्या बेताल वक्तव्याच्या निषेधार्थ संगमनेरमधील सर्व राजकीय पक्ष व पुरोगामी संघटना यांच्या वतीने १० वाजता संगमनेर बस स्थानक येथे तीव्र आंदोलन करण्यात येणार आहे. या सामूहिक पुस्तक वाचन कार्यक्रम व संजय गायकवाड यांच्या वक्तव्याच्या निषेधार्थ संगमनेरमधील सर्व राजकीय पक्ष, पुरोगामी व समाजसेवी संघटना, युवक संघटना, महिला संघटना, पदाधिकारी कार्यकर्ते पुरोगामी संघटना यांचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन करण्यात आले आहे.

**कायम वादग्रस्त वक्तव्य करणारा.. गरीबांना मारझोड करणारा... इतिहासाचे काडीमात्र ज्ञान नसणारा... परंतु स्वराज्यनिष्ठ राजे शिर्के घराण्याला खलनायक म्हणत गरळ ओकणारा... वाचाळ बोलणारा... उद्धट वागणारा.. गुंड प्रवृत्तीच्या आमदाराचा तीव्र जाहिर निषेध. तसेच जागतिक पुस्तक दिनानिमित्त लेखक शहीद कॉम्रेड गोविंद पानसरे यांचा अवमान करून पुस्तक प्रकाशक यांना धमकी दिल्याबद्दल तसेच 'शिवाजी कोण होता'? या पुस्तकाबाबत अपशब्द वापरत थेट छत्रपती शिवरायांचाही अवमान करणाऱ्या नालायक मूर्ख अनपड संजय गायकवाड वर गुन्हा दाखल करून तात्काळ अटक करावी.**

**- लक्ष्मीकांत राजे शिर्के ( प्रवक्ता, शंभुसेना )**
**( पत्रकार व इतिहास अभ्यासक )**

## रस्त्याच्या मधोमध जाहिरातींची कमान, अपघातांना निमंत्रण

### संगमनेरमधील नागरिकांमध्ये तीव्र संताप, सरकारी पैशांची उधळपट्टी

युवावार्ता (प्रतिनिधी)
संगमनेर- सरकारच्या जलसंपदा विभागामध्ये संपूर्ण तंत्रज्ञान ही इंजिनिअरिंग पद्धतीने वापरले जाते. मात्र इव्हेंटसाठी प्रसिद्ध असलेल्या महायुती सरकारने नव्याने या विभागांमध्ये धार्मिकीकरण सुरू केले असून या धार्मिकीकरणाची जाहिरातबाजी करताना रोडच्या मधोमध कमानी उभ्या करून अपघाताला निमंत्रण दिल्याने संगमनेरमधील नागरिकांमध्ये तीव्र संताप निर्माण झाला आहे.



संगमनेरच्या नाशिक - पुणे रोडवर विविध ठिकाणी जलसंपदा विभागाच्यावतीने कमानी उभ्या करण्यात आल्या आहे. या कमानी रस्त्याच्या मधोमध असून मोठ्या वाहनांना अडचण होत असल्याने अपघाताची शक्यता वाढली आहे. खरे तर जलसंपदा विभाग हा सिव्हिल इंजीनियरिंगशी संबंधित आहे. सर्व भागाला पाणी देणे. पाण्याचे नियोजन करणे पाणी पातळी याबाबत सिव्हिल इंजिनिअरिंग अत्यंत महत्त्वाचे आहे मात्र सध्या या विभागात इंजिनिअरिंग ऐवजी धार्मिकीकरण सुरू असल्याचे दिसते.

धर्म बाजूला आणि विकास कामे बाजूला असेल तरच खऱ्या अर्थाने प्रगती होते. मात्र सध्या प्रत्येक कामामध्ये धार्मिकीकरण दिसत असून हे अत्यंत दुर्दैवाचे आहे. प्रत्येक गोष्टीचे इव्हेंट करण्यासाठी प्रसिद्ध असलेल्या महायुतीने संगमनेर शहरांमध्ये विविध ठिकाणी रस्त्याच्या मधोमध कमानी लावल्या आहेत. या कमानी रस्त्याच्यामध्ये लावल्याने येणाऱ्या जाणाऱ्या मोठी अडचण निर्माण होत आहे. शनिवारचा बाजारचा दिवस असल्याने संगमनेरमध्ये मोठी वर्दळ आहे याच बरोबर सकाळ पासून महाविद्यालयीन विद्यार्थी शहरांमध्ये येणारे नागरिक महिला यांना या कमानींपासून मोठा अडथळा निर्माण झाला आहे. प्रशासन हे नागरिकाच्या सेवेसाठी असते मात्र सध्याचे प्रशासन हे राजकारण्यांच्या सोयीसाठी आहे की काय असा सवाल जनतेमधून विचारला जात आहे. रस्त्याच्या मधोमध लावलेल्या या कमानींमुळे नागरिक संतप्त झाले असून महायुतीच्या इव्हेंटबाजीचा खर्च हा जनतेच्या पैशांमधून होत आहे ही उधळपट्टी जनता कधीही सहन करणार नाही असे छात्र भारतीचे प्रदेशाध्यक्ष अनिकेत घुले यांनी म्हटले आहे.

याचबरोबर विविध ठिकाणी उभारलेल्या या बेशिस्त कमानींचा शहरातील सर्व नागरिकांनी निषेध केला असून नगरपालिका प्रशासनाने व पोलीसांनी डोळेझाक न करता नागरीकांची अडचण होणार नाही अशी काळजी घेणे महत्त्वाचे आहे.

## छत्रपती शिवाजी महाराज थकले अन् रामदासांना राजपाट दिला

### बागेश्वर बाबाचे वादग्रस्त वक्तव्य

**काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी बागेश्वर धामचे धीरेंद्र कृष्ण शास्त्री यांच्यावर तीव्र टीका करत त्यांच्या वक्तव्याचा जाहीर निषेध नोंदवला आहे. शिवरायांच्या पराक्रमाचा अपमान केल्याचा आरोप करत त्यांनी कठोर कारवाईची मागणी केली आहे. वडेट्टीवार यांनी आपल्या पोस्टमध्ये शिवाजी महाराजांच्या इतिहासाची आठवण करून दिली. त्यांनी नमूद केले की, आदिलशाही, कुतुबशाही, निजामशाही, बरीदशाही आणि इमादशाहीसह मोगल तसेच इंग्रज, डच आणि फ्रेंच सत्तांनाही शिवरायांच्या पराक्रमापुढे नतमस्तक व्हावे लागले होते. असा जाज्वल्य इतिहास असताना सार्वजनिक मंचावरून शिवरायांच्या कार्याचे अवमूल्यन करणे अत्यंत चुकीचे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.**




मुंबई (वृत्तसंस्था)
आपल्या वादग्रस्त विधानांनी नेहमीच चर्चेत राहणारे बागेश्वर धामचे धीरेंद्र कृष्ण शास्त्री (बागेश्वर महाराज) यांनी नागपुरातील भाषणात छत्रपती शिवाजी महाराज आणि समर्थ रामदास स्वामी यांच्यावर भाष्य केले. शिवाजी महाराज युद्धाने थकले होते आणि त्यांनी आपले राज्य समर्थांच्या चरणी अर्पण केले असे विधान बागेश्वर महाराज यांनी केले. या विधानावर सर्व स्तरातून तीव्र संतापाची लाट उसळली आहे.

जगातील पहिले भारतदुर्गा मंदिर नागपूरच्या जामठा परिसरात उभारले जाणार आहे. त्याचा भव्य शिलान्यास सोहळा नागपूरमध्ये पार पडला. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची प्रमुख उपस्थिती होती.

(पान ६)










# सर्व प्रवासी वाहनांसाठी लागू होणार मराठीची सक्ती

## परिवहन विभागाने टाकली कायदेशीर पावले

मुंबई (वृत्तसंस्था)

राज्यातील ऑटो रिक्षा, टॅक्सी तसेच इतर सर्व सार्वजनिक वाहतूक वाहनांचे परवाने घेण्यासाठी चालकांना प्रवाशांशी मराठीत संवाद साधणे अनिवार्य करण्याचा प्रस्ताव राज्य शासनाने तयार केला आहे. यासाठी महाराष्ट्र मोटार वाहन नियम, १९८९मधील नियम ४, ७८ आणि ८५मध्ये सुधारणा करण्याचा मसुदा तयार केला असून, चालकांना मराठी भाषेचे 'व्यावहारिक ज्ञान' असणे बंधनकारक करण्याची तरतूद करण्यात आली आहे. राज्य परिवहन आयुक्तांनी हा प्रस्ताव गृह



विभागाकडे पाठवला असून, मसुदा अधिसूचना जारी करण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. प्रस्तावित बदलांनुसार, सार्वजनिक सेवा वाहन चालविण्याची परवानगी देताना अर्जदाराच्या पार्श्वभूमीसह मराठी भाषेचे व्यावहारिक ज्ञान तपासण्याचा अधिकार परवाना प्राधिकरणाला असेल.

याआधी सहा आसन क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी क्षमता असलेल्या वाहनांसाठी मराठी अनिवार्य होते, तर नव्या तरतुदीनुसार सहापेक्षा कमी प्रवासी क्षमता असलेल्या वाहनांसाठीदेखील हा नियम अनिवार्य करण्यात येणार आहे. हरकती मागविण्याची प्रक्रिया सुरूनियमावलीचा मसुदा जाहीर झाल्यावर नागरिक, संघटना आणि संबंधित घटकांकडून हरकती व सूचना मागविण्यात येतील.

# थोरात कारखान्याच्या पुढाकाराने निळवंडे कालवे पाईपलाईन टाकण्याचे काम सुरू

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - जिल्ह्यातील दुष्काळी भागाला पाणी मिळावे, यासाठी माजी महसूलमंत्री बाळासाहेब थोरात यांनी निळवंडे धरण व कालवे पूर्ण केले. संगमनेर तालुक्यातील चिंचोलीगुरव येथील वंचित शिवारातील शेतील पाणी मिळण्यासाठी थोरात कारखान्याच्या पुढाकारातून सिमेंट पाईप टाकण्याचे काम सुरु करण्यात चिंचोली गुरव येथील जाते खाणी बंधारा ते शिवाचा मळा येथे सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखान्याच्या माध्यमातून सिमेंट पाईप टाकण्याचे काम सुरू करण्यात आले. यावेळी थोरात साखर कारखान्याचे उपाध्यक्ष



पांडुरंग घुले, संचालक संपतराव गोडगे, सरपंच विलास सोनवणे, विलास सोनवणे, संदेश गोडगे, विजय गोडगे, डॉ. सुहास आभाळे, लक्ष्मण सोनवणे, प्रताप गोडगे, सतीश गोडगे, बबन गोडगे, भास्करराव पानसरे, राजेंद्र गोडगे, विनोद गोडगे, हरि वाघ, भाऊसाहेब गोडगे, वैभव आभाळे, रवि वाणी, भाऊसाहेब वाणी, अनिल गोडगे, विनोद गोडगे तसेच ग्रामस्थ उपस्थित होते.

निळवंडे डाव्या कालव्यातून चिंचोली गुरव शिवारात कारखान्याच्या माध्यमातून पाणी आले असून जातेखाणी बांधात ते शिवाचा मळा या दोन किलोमीटर लांबीच्या अंतरावर सिमेंट पाईप टाकण्यात येणार आहे. या प्रसंगी पांडुरंग घुले म्हणाले, थोरात कारखान्याच्या माध्यमातन पाईप टाकून बंधाऱ्यांमध्ये पाणी टाकले जात आहे सध्याचे सत्ताधारी जना हा परिसर माहिती नाही. ज्यांना शेतकऱ्यांचे काही घेणे घेणे नाही ते फक्त फोटोसाठी येत आहेत. दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांसाठी माजी मंत्री बाळासाहेब थोरात हेच पाणी देणार आहे. जास्तीत जास्त शेतकऱ्यांना पाणी देण्यासाठी थोरात कारखाना सातत्याने प्रदित करेल, असे त्यांनी सांगीतले.

की, संपतराव गोडगे म्हणाले की, थोरात कारखान्याच्या माध्यमातून या परिसरामध्ये विविध गावांना पाणी देण्याचे काम केले आहे. देवकौठे येथेही कारखान्याने सिमेंट पाईप घेऊन पाणी पुढे नेण्यासाठी सर्व यंत्रणांसह मोठी मदत केली आहे. चिंचोली गावच्या काही भागाला यामुळे प्राणी मिळाले आहे. सर्व भागाला पाणी देण्यासाठी माजी महसूलमंत्री बाळासाहेब थोरात यांच्या माध्यमातूनच प्रयत्न होत आहेत. प्रसंगी सरपंच विलास सोनवणे म्हणाले, महायुतीचे सर्व या भागातील पुढारी फर्क फोटो वाले आहेत. त्यांना पाण्याचे घेणेदेणे नाहीं. सोशल मीडियावर स्वतःची प्रसिद्ध करणारे कधीही काम करत नाहीत. पंधरा मिनिट सुद्ध कामावर न थांबणारे मंडळ श्रेय घेण्यासाठी पुढे येत्तता असा टोला त्यांनी लगावला सूत्रसंचालन विलास सोनवर्ष यांनी केले.

# आरबीआयची मोठी कारवाई

## पेटीएम पेमेंट्स बँकेचा परवाना रद्द

मुंबई (वृत्तसंस्था)

भारतीय रिझर्व्ह बँकेने शुक्रवारी पेटीएम पेमेंट्स बँकेवर कठोर कारवाई करत त्यांचा बँकिंग परवाना तात्काळ प्रभावाने रद्द केला आहे. बँकिंग नियमन कायदा, १९४९ अंतर्गत हा परवाना रद्द करण्यात आला असून, आता ही बँक भारतात बँकिंग व्यवहार करण्यास पात्र राहणार नाही.


आरबीआयने आपल्या आदेशात या कारवाईमागील स्पष्ट कारणे नमूद केली आहेत. बँकेचे कामकाज आणि व्यवस्थापन हे ठेवीदारांच्या हितासाठी नुकसानकारक असल्याचे आरबीआयला आढळून आले. पेमेंट बँक परवान्यासाठी आवश्यक असलेल्या अटींचे पालन करण्यात बँक वारंवार अपयशी ठरली. यापूर्वी झालेल्या तपासात एकाच पॅन कार्डवर हजारो खाती उघडणे आणि केवायसी प्रक्रियेतील गंभीर त्रुटी समोर आल्या होत्या. ज्या ग्राहकांच्या खात्यात किंवा वॉलेटमध्ये आधीच रक्कम शिल्लक आहे, त्यांना ती काढण्यावर किंवा वापरण्यावर कोणतेही निर्बंध नाहीत. आता ग्राहकांना त्यांच्या पेटीएम बँक खात्यात, वॉलेटमध्ये किंवा फास्टॅगमध्ये नवीन पैसे जमा करता येणार नाहीत.

ऑगस्ट २०१५ मध्ये विजय शेखर शर्मा यांच्या मालकीच्या 'वन ९७ कम्युनिकेशन्स'च्या पाठबळावर पेटीएमला बँकिंग परवाना मिळाला होता. या परवान्यानुझरींसार त्यांना ठेवी स्वीकारण्याची परवानगी होती, मात्र थेट कर्ज देण्याचे अधिकार नव्हते. मार्च २०२२ मध्ये ग्राहकांच्या पडताळणीत त्रुटी आढळल्याने आरबीआयने ११ मार्च २०२२ पासून नवीन ग्राहक जोडण्यावर बंदी घातली होती. जानेवारी २०२४ मध्ये नियमांचे उल्लंघन, निधीचा वापर आणि तांत्रिक पायाभूत सुविधांमधील त्रुटींमुळे आरबीआयने बँकेला नवीन ठेवी स्वीकारणे बंद करण्याचे आदेश दिले होते. वारंवार दिलेल्या सूचनांनंतरही सुधारणा न झाल्यामुळे शेवटी आरबीआयने बँकिंग परवानाच रद्द करण्याचा टोकाचा निर्णय घेतला.

# सोमवारपासून कृषी विक्रेत्यांचे आंदोलन, खरीप हंगाम अडचणीत

युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर- रासायनिक खत कंपन्याकडून खत पुरवठा होत असताना केले जाणारे लिंकिंग बंद करावे, शेजारच्या राज्यातून येणाऱ्या अप्रमाणीत एचटीबीटी कापूस बियाणांची विक्री बंद करावी, खत टंचाईच्या पार्श्वभूमीवर आगामी खरीप हंगामात खत वितरणाच्या कार्यपद्धीत केले जाणारे संभाव्य बदल संघटनेशी चर्चा करून घ्या, आदी प्रमुख मागण्यांसाठी महाराष्ट्र फर्टीलायझर्स पेस्टीसाईडस सीडस डिलर्स असोसिएशनने (माफदा) सोमवारी, २७ एप्रिलपासून बेमुदत विक्री बंद आंदोलनाची घोषणा केली आहे.





खत कंपन्याकडून रासायनिक खतांचा पुरवठा होताना होत असलेले लिंकिंग बंद व्हावे. शेजारील राज्यातून येणारे अप्रमाणीत एचटीबीटी कापूस बियाणांची विक्री बंद करावी. प्रमाणित बियाण्यासंबंधी साथी पोर्टलचा वापराची विक्रेत्यावर सक्ती न करता, साथी पोर्टल बियाणे उत्पादक व पुरवठादार कंपनीस्तरापर्यंत राबविणेत यावी. रासायनिक खतांचा पुरवठा सध्या रेल्वे माल धक्यावपर्यंत किवा कंपनी गोडावूनमधून केला जात आहे. रासायनिक खतांच्या वितरण नियमानुसार सर्व रासायनिक खतांचा पुरवठा विक्रेत्यांच्या विक्री केंद्रापर्यंत पोहोच पध्दतीने देणे बंधनकारक करावे. आयकर/जीएसटी कायद्याप्रमाणे सर्व खर्च वजा जाऊन आठ टक्के दराने खत विक्रीचा नफा मिळावा.

तपासणीमध्ये बियाणे, खते व किटकनाशके यांचे नमुना अप्रमाणीत आल्यास, विक्रेत्यास आरोपी न करता, विक्रेत्याने हजर केलेल्या पुराव्याप्रमाणे कायद्यातील तरतुदीनुसार साक्षीदार म्हणून ग्राह्य धरावा. विक्री केंद्राची तपासणी करणाऱ्या अधिकाऱ्यांची संख्या कमी करावी. केंद्र सरकारच्या नवीन बियाणे कायदा २०२५ मधील विक्रेत्यासाठीच्या प्रस्तावित जाचक नियम शिथिल करावेत. युरिया व डीएपी खतांच्या वितरणाच्या कार्यपद्धती बदल करण्याचा निर्णय संघटनेशी चर्चा करून घ्यावा, आदी मागण्या माफदाने केल्या आहेत.

आमच्या मागण्या त्वरीत मान्य न झाल्यास राज्यातील सर्व जिल्ह्यांतील सर्व विक्री केंद्रे, सोमवार, २७ एप्रिलपासून बेमुदत कालावधीसाठी बंद रहातील. संघटनेच्या विविध मागण्यासाठी सतत पाठपुरावा करीत आहोत. पण, कृषी विभागाकडून विक्रेत्यांच्या अडचणी सोडविण्याबाबत ठोस निर्णय झालेला नाही, अशी माहिती माफदाचे अध्यक्ष विनोद तराळ-पाटील यांनी दिली.

# कर्नाटक सरकारचा मोठा निर्णय !

## अनुसूचित जातींच्या अंतर्गत आरक्षणाला मंजुरी

नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

सिद्धरामय्या यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या विशेष मंत्रिमंडळ बैठकीत कर्नाटक सरकारने अनुसूचित जाती आरक्षणाच्या १५ टक्के कोट्याचे अंतर्गत वर्गीकरण करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे आरक्षणाचा लाभ अधिक न्याय्य पद्धतीने विविध घटकांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न करण्यात आला असून, दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या नोकरभरती प्रक्रियेलाही यामुळे गती मिळणार आहे.

सरकारने जाहीर केलेल्या नव्या सूत्रानुसार, एकूण १५ टक्के आरक्षणाचे तीन प्रमुख श्रेणींमध्ये विभाजन करण्यात आले आहे. यामध्ये श्रेणी १ साठी ५.२५ टक्के आरक्षण मादिगा व संबंधित दलित डावे गटांना देण्यात आले आहे, तर श्रेणी २ मध्ये होलेया व संबंधित दलित उजवे गटांना ५.२५ टक्के



कोटा राखून ठेवण्यात आला आहे. उर्वरित ४.५ टक्के आरक्षण श्रेणी ३ अंतर्गत भोवी, लमाणी, कोरमा, कोराचा तसेच इतर ५९ भटक्या जमातींना देण्यात आले आहे.

मंत्रिमंडळ बैठकीनंतर बोलताना मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी हा निर्णय ऐतिहासिक आणि सर्वसहमतीने घेतलेला असल्याचे सांगितले. २०२३ च्या विधानसभा निवडणुकीच्या जाहीरनाम्यात तसेच चित्रदुर्ग अधिवेशनात दिलेल्या आश्वासनाची पूर्तता झाल्याचे त्यांनी नमूद केले. या निर्णयाचे सर्व दलित घटक स्वागत करतील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

अनुसूचित जातीमधील काही घटकांना आरक्षणाचा लाभ पुरेशा प्रमाणात मिळत नसल्याची तक्रार अनेक वर्षांपासून होती. त्या पार्श्वभूमीवर हे उप-वर्गीकरण करण्यात आले असून, आरक्षणाचे फायदे अधिक समतोल पद्धतीने वाटले जातील, असा सरकारचा दावा आहे. यापूर्वीही १७ टक्के आरक्षणात उप-वर्गीकरणाचा प्रयत्न करण्यात आला होता, मात्र तो पूर्णपणे अंमलात आला नव्हता.

दरम्यान, या निर्णयामुळे आता सरकारी नोकरभरती प्रक्रिया पुन्हा सुरू होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. मंत्रिमंडळाने मंजूर केलेल्या या सुधारित सूत्रानुसार, लवकरच अधिकृत अधिसूचना जारी करण्यात येणार असून, आजपासूनच भरती प्रक्रियेची तयारी सुरू होणार असल्याचे सरकारने स्पष्ट केले आहे.

# डाळिंब फळे तोडून टाकली, बांबू डेपो पेटवला

## अज्ञातांविरुद्ध गुन्हा दाखल

युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले - तालुक्यातील वीरगाव येथील शेतकरी विठ्ठल श्रीपत कुमकर यांच्या राहत्या घरासमोर अज्ञात व्यक्तींनी डाळिंब पिकाचे मोठे नुकसान केल्याची घटना उघडकीस आली आहे. देवठाण रोडवरील त्यांच्या घरासमोरील फळधारणा झालेल्या 'डाळिंब पिकाची फळे तोडून टाकण्यात आली.

याशिवाय घरासमोर उभ्या असलेल्या बांबूच्या डेपोला आग लावण्यात आली. तसेच जवळील शेडनेट्चे कापडही फाडण्यात आले. या घटनेत कुमकर यांचे अंदाजे दोन ते तीन लाख रुपयांचे नुकसान झाले आहे. बुधवारी मध्यरात्रीच्या सुमारास ही घटना

घडली. त्या दिवशी वीरगाव येथे अंबिका मातेच्या यात्रोत्स-वाचा दुसरा दिवस असल्याने कुमकर कुटुंबातील सर्वजण आखाड्यासाठी गावात गेले होते. याचाच फायदा घेत अज्ञात व्यक्तींनी हा प्रकार केल्याचे समजते. या प्रकरणी विठ्ठल कुमकर यांनी अकोले पोलीस ठाण्यात तक्रार दिली असून अज्ञात इसमाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक मोहन बोरसे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

# ग्राहकांच्या आरोग्यासाठी मोठा निर्णय

## आर्टिफिशियल पनीरवर लगाम

मुंबई (वृत्तसंस्था)

हॉटेल आणि रेस्टॉरंटमध्ये पनीर म्हणून 'चीज अनॅलॉग' (आर्टिफिशियल पनीर) विकणाऱ्यांविरुद्ध आता केंद्र सरकारने कडक पावले उचलली आहेत. महाराष्ट्र सरकारने यापूर्वी घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी आता देशभर करण्याचे आदेश केंद्र शासनाने दिले आहेत. भाजप आमदार विक्रमसिंह पाचपुते यांनी विधिमंडळ अधिवेशनात हा गंभीर मुद्दा उपस्थित केला होता, ज्याची दखल घेत 'एफएसएसएआय' ने आता कडक कारवाईसाठी परिपत्रक जारी केले आहे. या नवीन निर्णयामुळे हॉटेल, फास्ट फूड सेंटर्स आणि कॅटरर्सना आता ग्राहकांची दिशाभूल करता येणार नाही.

येत्या १ मेपासून सर्व हॉटेल चालकांना त्यांच्या मेनू कार्डमध्ये महत्त्वाचे बदल करावे लागणार आहेत. जर एखाद्या डिशमध्ये खऱ्या पनीरऐवजी 'चीज अनॅलॉग' वापरले जात असेल, तर तसा स्पष्ट उल्लेख मेनू कार्डवर करावा लागेल. केवळ पनीर लिहून कृत्रिम पनीरची विक्री केल्यास ग्राहकांची फसवणूक मानली जाईल. एफडीए आणि एफएसएसएआयकडून या नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येणार आहे. हॉटेल व्यावसायिकांनी नियमांचे पालन न केल्यास त्यांचे परवाने देखील रद्द होऊ शकतात.पनीर आणि चीज अनॅलॉग दिसायला सारखे असले तरी त्यांच्या गुणधर्मात मोठी तफावत आहे. सामान्य नागरिकांना ओळखता यावे यासाठी काही महत्त्वाचे फरक जाणून घेऊ..

घटक: खरे पनीर केवळ दुधापासून बनवले जाते, तर चीज अनॅलॉगमध्ये पाम तेल, स्टार्च आणि मिल्क सॉलिड्सचा वापर होतो. पनीरमध्ये उच्च दर्जाचे प्रोटीन असते, तर कृत्रिम पनीरमध्ये अनहेल्दी फॅट्स आणि कोलेस्ट्रॉल वाढवणारे घटक असतात. खरे पनीर मऊ असते, तर चीज अनॅलॉग रबरासारखे चिवट आणि थोडे तेलकट असते. चीज अनॅलॉग सुमारे १५० ते २१० रुपये किलो मिळते, तर खऱ्या पनीरचा दर ३५० ते ४०० रुपये किलो इतका असतो.

स्वस्त दरात मिळणारे कृत्रिम पनीर वापरून ग्राहकांच्या आरोग्याशी खेळ केला जात असल्याचा आरोप आमदार पाचपुते यांनी केला होता.

# बंद पडलेल्या डिस्टिलरीज पुन्हा सुरू

## सरकारच्या निर्णयाचा फायदा

मुंबई (वृत्तसंस्था)

महाराष्ट्र सरकारने राज्याच्या अर्थकारणाला गती देण्यासाठी आखलेल्या महाराष्ट्र मेड लिकर' (एमएमएल) २०२५ धोरणाचे सकारात्मक परिणाम आता दिसू लागले आहेत. या धोरणांतर्गत नव्याने परवाना मिळालेल्या १५ उद्योगांनी शून्यातून थेट ३ कोटी लिटरहून अधिक उत्पादन घेतले आहे. या क्रांतिकारी निर्णयामुळे राज्यातील मद्य उद्योगात मोठी उभारी आली असून गेल्या वर्षी पाच महिन्यांत राज्याच्या अबकारी महसुलात तब्बल १,६०० कोटींची भर पडली. दरवर्षी ३,००० कोटी अतिरिक्त महसूल मिळण्याची अपेक्षा राज्य उत्पादन विभागाच्या अधिकाऱ्यांनी व्यक्त केली.

राज्यात धान्यावर आधारित मद्यनिर्मितीसाठी सुमारे ४० डिस्टिलरीजची क्षमता असतानाही अनेक युनिट्स तांत्रिक किंवा धोरणात्मक कारणांमुळे बंद होती. मात्र, सरकारने एमएमएल' ही स्वतंत्र श्रेणी सुरू करून या उद्योगांना मोठा दिलासा दिला. छत्रपती संभाजीनगर, नागपूर, पुणे, पालघर, रायगड, सांगली आणि सोलापूर या जिल्ह्यांमधील उद्योगांना यामुळे नवसंजीवनी मिळाली आहे. या धोरणाचा लाभ घेणाऱ्यांमध्ये आघाडीच्या कंपन्यांमध्ये ग्रेनॉटच इंडस्ट्रीज लिमिटेड, कोकण ॲग्रो मरीन इंडस्ट्रीज, रॅडिको एनव्ही डिस्टिलरीज महाराष्ट्र लिमिटेड, असोसिएटेड ब्लेंडर्स विष्णू लक्ष्मी को-ऑप. ग्रेप डिस्टिलरी आदी कंपन्यांचा समावेश आहे. या कंपन्यांचे उत्पादन यापूर्वी शून्य किंवा नगण्य होते. मात्र, नव्या परवान्यांनंतर या युनिट्समधून ३,०१,८३,६४८ लिटर उत्पादनाची नोंद झाली आहे.

राज्याला अबकारी करातून सन २०२४ ते २०२५ मध्ये २२ हजार ३६६.२४ कोटी रुपयांचा महसूल जमा झाला, तर २०२५ ते २०२६ या आर्थिक वर्षात २५,१९०.१३ कोटी रुपयांची महसुलात भर पडली आहे. मद्यविक्री परवाने आणि संबंधित शुल्कांमधून हा महसूल प्राप्त झाला आहे. या धोरणामुळे वर्षाकाठी राज्याला सुमारे ३,००० कोटींचा अतिरिक्त महसूल मिळण्याची दाट शक्यता वर्तवण्यात आली आहे. स्थानिक स्तरावर धान्याचा वापर वाढल्याने शेतकऱ्यांनाही याचा अप्रत्यक्ष लाभ मिळण्याची चिन्हे आहेत.

# माझ्या निधनानंतर पत्नीने कोणत्याही विधवा प्रथा पाळू नये

## सौंदाळाचे सरपंच शरद आरगडे यांचे इच्छापत्र, विधवा प्रथांना नकार

नेवासा ( प्रतिनिधी)

नेवासा तालुक्यातील सौंदाळा ग्रामपंचायतीचे सरपंच शरद बाबुराव आरगडे यांनी समाजातील अनिष्ट रूढींविरोधात ठाम भूमिका घेत, स्वतःचे इच्छापत्र तयार केले आहे. त्यांनी केवळ जिवंतपणी स्वतःचा दहावा घालून समाजाचे लक्ष वेधले नाही, तर १०० रुपयांच्या स्टॅम्प पेपरवर कायदेशीर प्रतिज्ञापत्र तयार क्रेरून, विधवा स्त्रियांना दिल्या जाणाऱ्या दुय्यम वागणुकीवर प्रहार केला आहे.

या प्रतिज्ञापत्रात त्यांनी स्पष्ट माझ्या निधनानंतर कोणतेही धार्मिक विधी करू नयेत नमूद केले आहे की, माझ्या निधनानंतर माझ्या पत्नीने कोणत्याही विधवा प्रथा पाळू नयेत. तिने कुंकू पुसू नये, बांगड्या फोडू नयेत किंवा मंगळसूत्र उतरवू नये. श्रीमती प्रियंका शरद आरगडे या माझ्या पत्नी असून, समाजात प्रचलित असलेल्या विधवा प्रथा, जसे की कुंकू



पुसणे, बांगड्या फोडणे, मंगळसूत्र काढणे, पांढरे वस्त्र परिधान करण्याची सक्ती, कार्यक्रमांपासून दूर ठेवणे या अत्यंत अमानवीय असून तसेच धार्मिक व सामाजिक स्त्रियांच्या सन्मानाला बाधा आणणाऱ्या आहेत. माझ्या मृत्यूनंतर माझ्या पत्नीवर कोणतीही अशी प्रथा लादली स्त्रीप्रमाणेच कुंकू-टिकली जाऊ नये. तिला विधवा लेखणे, बांगड्या व

### देहदान व कर्मकांडमुक्तीची स्पष्ट भूमिका

दागिने परिधान करणे, कोणत्याही रंगाचे वस्त्र परिधान करणे आणि सर्व सण-समारंभ, धार्मिक व सामाजिक कार्यक्रमांमध्ये आनंदाने सहभागी होण्याचा पूर्ण अधिकार आहे. माझ्या कुटुंबियांनी, नातेवाईकांनी किंवा समाजाने तिला यापासून रोखू नये, तिच्याशी कोणत्याही प्रकारची जबरदस्ती किंवा अपमानास्पद वागणूक भूमिका त्यांनी मांडली आहे. दिली जाऊ नये, अशी स्पष्ट श्री. अरगडे यांनी त्यांच्या इच्छापत्रात मृत्यूनंतरच्या धार्मिक विधींविषयीही आपली भूमिका स्पष्ट केली आहे. दहावा, तेरावा किंवा श्राद्ध यांसारख्या विधींवर अनावश्यक खर्च केला जातो. माझा या रूढींवर विश्वास नाही. मृत्यूनंतर आत्म्याच्या शांतीसाठी विधी नव्हे, तर जिवंतपणी केलेली चांगली कर्मे महत्त्वाची असतात, असे त्यांनी नमूद केले आहे. या प्रतिज्ञापत्रावर सचिन अशोक आरगडे व गणेश अरुण आरगडे केल्या आहेत. विशेष म्हणजे, यांनी साक्षीदार म्हणून स्वाक्षऱ्या हे इच्छापत्र त्यांनी जाहीर स्वतः वाचून दाखवले, ज्यामुळे कार्यक्रमात ध्वनीक्षेपकावर समाजात या विषयावर चर्चा सुरू झाली आहे.

माझ्या निधनानंतर कोणतेही सुतक पाळू नये, दहावा, तेरावा, पिंडदान किंवा तत्सम धार्मिक विधी करू नयेत. माझे हे प्रतिज्ञापत्र माझ्या पश्चात कुटुंबीय व समाजासाठी इच्छापत्र म्हणून मान्य करावे, अशी माझी शेवटची इच्छा आहे.

**शरद आरगडे, सरपंच**
**सौंदाळा, ता. नेवासा**

संगमनेरकरांनी गौरविलेले
।।जय श्रीराम।।
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

मणके विकार, गुडघेविकार, अस्थिविकार
सुरिक्षत, खात्रिशीर व परीपूर्ण उपचारासाठी आजच भेटा
डॉ. सुभाष दत्तात्रय मंडलिक
मणके विकार, गुडघेविकार व अस्थिविकार चिकीत्सक
(२४ वर्षांचा प्रदिर्घ अनुभव)
मंदना मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
लक्ष्मी नगर, रहाणे मळा, संगमनेर
संपर्क - ९८२२७०९०३०

जिथे काळजी आणि उपचार एकत्र येतात...
ताम्हाणे हॉस्पिटल
• मेडिसिन • सर्जरी
• स्त्रीरोग - प्रसुति
• मुळव्याध-भगंदर-फिशर
• लेझर सेंटर
डॉ. ताम्हाणे विशाल वसंत
(M.S.) शल्य
कन्सल्टंट जनरल व लेझर सर्जन
डॉ. ताम्हाणे रुपाली विशाल
स्त्रीरोग / प्रसुती चिकित्सक
इंदिरा नगर, गल्ली नं. १०, संगमनेर
: Help Line :
7219 100 100

शेतकऱ्यांचा श्वास ! ग्राहकांचा विश्वास !!
राजहंस
दर्जेदार राजहंस दूध व दूधजन्य पदार्थ
संगमनेर तालुका सह. दूध उत्पा. व प्रक्रिया संघ मर्या.
अमृतनगर (घुलेवाडी), ता. संगमनेर, जि. अहमदनगर
(०२४२५) २२५४१०, २२५५१०, २२६१६१, २२६१६२
www.rajhansmilk.com rajhansmilk@gmail.com




# सरकारी कर्मचाऱ्यांच्या आंदोलनाला आ. सत्यजीत तांबेंचा पाठिंबा

## कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांवर तोडगा काढण्यासाठी मुख्यमंत्र्यांना पत्राद्वारे मागणी

संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)-

राज्यातील शासकीय, निमशासकीय कर्मचारी तसेच शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सुरू असलेल्या बेमुदत आंदोलनाला आमदार सत्यजीत तांबे यांनी ठाम पाठिंबा दर्शवला आहे. दि. २१ एप्रिल २०२६ पासून सुरू झालेल्या या आंदोलनामध्ये राज्यातील सुमारे १७ लाख कर्मचारी सहभागी असून, आपल्या न्याय्य हक्कांसाठी कर्मचारी वर्गाला आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागत असल्याबद्दल तांबे यांनी तीव्र खंत व्यक्त केली यासंदर्भात आमदार तांबे यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सविस्तर पत्र पाठवून आंदोलनाची तातडीने दखल घेण्याची मागणी केली. राज्याची अनेक वर्षे प्रामाणिकपणे सेवा करणाऱ्या कर्मचारी आणि शिक्षकांना त्यांच्या मूलभूत हक्कांसाठी रस्त्यावर उतरावे लागत आहे, ही शासनासाठी अत्यंत गंभीर आणि तितकीच लाजिरवाणी बाब असल्याचे त्यांनी पत्रात नमूद केले आहे.



पत्रात आमदार तांबे यांनी कर्मचारी समन्वय समितीमार्फत मांडण्यात आलेल्या मागण्या या केवळ आर्थिक नसून, प्रशासनाच्या कार्यक्षमतेशी निगडित असल्याचे स्पष्ट केले आहे. १ नोव्हेंबर २००५ पूर्वी नियुक्त झालेल्या शिक्षकांना जुनी पेन्शन योजना लागू करणे, टीईटी सक्तीची अट रद्द करणे, संचमान्यता संदर्भातील अन्यायकारक निर्णय मागे घेणे तसेच प्रशासनातील रिक्त पदे तातडीने भरणे या प्रमुख मागण्या शासनाने तातडीने निकाली काढाव्यात, अशी मागणी त्यांनी केली आहे. आरोग्य सुविधांबाबतही महत्त्वाचा मुद्दा उपस्थित करत, सर्व शासकीय कर्मचारी, निवृत्तीवेतनधारक आणि कंत्राटी कर्मचाऱ्यांना वैद्यकीय बिले कॅशलेस पद्धतीने मिळावीत, यासाठी व्यापक धोरण राबवण्याची आवश्यकता त्यांनी अधोरेखित केली. याबाबत आपण सातत्याने सभागृहात आवाज उठवत असूनही शासनाकडून अद्याप ठोस निर्णय झालेला नसल्याची खंत त्यांनी व्यक्त केली.

यासोबतच देशातील २६ राज्यांप्रमाणे महाराष्ट्रातील शासकीय कर्मचाऱ्यांचे निवृत्तीचे वय ५८ वरून ६० वर्षे करणे, ही केवळ मागणी नसून काळाची गरज असल्याचेही तांबे यांनी नमूद केले. अनेक राज्यांनी हा निर्णय घेतलेला असताना महाराष्ट्रातील कर्मचाऱ्यांना मात्र आजही ५८ व्या वर्षी निवृत्त व्हावे लागते, ही अन्यायकारक बाब असल्याचे त्यांनी म्हटले. अनुभवी अधिकारी व कर्मचाऱ्यांची सेवा आणखी दोन वर्षे राज्याला मिळू शकते आणि प्रशासन अधिक सक्षम होऊ शकते, याकडेही त्यांनी लक्ष वेधले. तसेच १०:२०:३० सेवांतर्गत प्रगती योजना लागू करणे, अनुकंपा भरती तातडीने पूर्ण करणे, खाजगीकरण व बाह्य यंत्रणेद्वारे होणारी भरती थांबवणे आणि कंत्राटी पद्धतीमुळे निर्माण झालेली अस्थिरता संपवून नियमित भरती प्रक्रियेला गती देणे, या मागण्यांचाही त्यांनी पुनरुच्चार केला. वारंवार होणाऱ्या या आंदोलनांमुळे प्रशासनातील स्थैर्य बिघडत असून, शासनाने आता केवळ चर्चा न करता कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांवर तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा. कर्मचारी संघटनांशी नियमित संवाद साधून या प्रश्नांवर कायमस्वरूपी तोडगा काढावा, अशी मागणी आमदार सत्यजीत तांबे यांनी केली.

वर्षानुवर्षे राज्याची प्रामाणिकपणे सेवा करणाऱ्या कर्मचारी आणि शिक्षकांना आज त्यांच्या मूलभूत हक्कांसाठी आंदोलन करावे लागत आहे, ही अत्यंत लाजिरवाणी बाब आहे. राज्य सरकारने आता केवळ चर्चा न करता, कर्मचाऱ्यांच्या संयमाचा अंत न पाहता, तातडीने निर्णय घ्यावा.

- आमदार सत्यजीत तांबे

# ३० एप्रिलनंतर लाडकी बहीण योजनेचा लाभ बंद? केवायसी दुरुस्तीला शेवटची मुदत जवळ

मुंबई (प्रतिनिधी)-



लाडकी बहीण योजनेतील लाभार्थ्यांना मार्च-एप्रिलचा हप्ता कधी येणार, असा प्रश्न पडला आहे. दरम्यान, आता ३० एप्रिलनंतर अनेक महिलांचा लाभ कायमचा बंद होणार आहे. या महिलांना दर महिन्याला १५०० रुपये मिळणार नाहीत. दरम्यान, लाडकी बहीण योजनेत अपात्र महिलांचा लाभ याआधीच बंद करण्यात आला आहे. त्यात आता महिलांना केवायसी करण्यास सांगितले आहे.

केवायसीमधील दुरुस्तीसाठी फक्त ८ दिवस उरले आहेत. त्या काळात महिलांनी केवायसीमध्ये दुरुस्ती केली नाही, तर त्यांचा लाभ बंद होणार आहे. या महिलांना कधीच पैसे मिळणार नाहीत. लाडकी बहीण योजनेत केवायसी केल्यानंतर महिलांची पुन्हा पडताळणी होणार आहे. या पडताळणीत जर तुम्ही अपात्र ठरलात, तर तुमचा लाभ कायमचा बंद केला जाणार आहे. महिलांना यापुढे १५०० रुपये मिळणार नाहीत. त्यामुळे, जर तुम्ही अपात्र असाल, केवायसी केली नसेल, तर तुमचा लाभ बंद केला जाणार आहे.

लाडकी बहीण योजनेत जर तुम्ही याआधी केवायसी करताना काही चूक केली असेल, तुमचा लाभ बंद झाला असेल, तर तुम्हाला त्यात दुरुस्ती करायची आहे. जर तुम्ही दुरुस्ती केली नाही, तर तुमचा लाभ बंद केला जाईल. तुम्हाला अधिकृत वेबसाइटवर जाऊन दुरुस्ती करायची आहे.

# संजय गायकवाड व बागेश्वर बाबा यांच्या वक्तव्यांबाबत मुख्यमंत्र्यांनी आपली भूमिका स्पष्ट करावी : माकप

()-

छत्रपती शिवाजी महाराज यांचा खरा इतिहास जनतेसमोर आणणाऱ्या कॉम्रेड गोविंद पानसरे यांच्या 'शिवाजी कोण होता?' या पुस्तकाच्या शीर्षकावरून शिवसेनेचे आमदार संजय गायकवाड यांनी या पुस्तकाचे संपादक प्रशांत अंबी यांना अत्यंत वाईटरीत्या शिवीगाळ केली आहे व धमक्या दिल्या आहेत. माता भगिनींवरून त्यांनी वापरलेली भाषा कोणत्याही सभ्य माणसाला सहन होणार नाही, अशी आहे. आमदार संजय गायकवाड यांचा व त्यांच्या पक्षाचा देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारला पाठिंबा आहे. आपल्याला व आपल्या सरकारला पाठिंबा देणाऱ्या संजय गायकवाड यांच्या वक्तव्याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपले काय म्हणणे आहे, हे स्पष्ट करण्याची आवश्यकता असल्याचे मत भारतीय कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी) चे राज्यसचिव डॉ. अजित नवले मांडले. एकीकडे नारी वंदनाची बात करायची व दुसरीकडे महिलांना अशा प्रकारे भाषा वापरणाऱ्यांचा पाठिंबा घेत, त्यांच्या कृतीचे मौन बाळगत समर्थन करायचे, हा दुटप्पीपणा सोडण्याची आवश्यकता आहे.



महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे श्री. मोहन भागवत यांच्या उपस्थितीमध्ये कथावाचक बागेश्वर बाबा यांनी छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल अत्यंत वादग्रस्त विधान केले आहे. छत्रपती शिवाजी महाराज हे थकले होते व त्यांनी आपला राजमुकुट आणि राजसत्ता रामदास स्वामी यांच्यासमोर ठेवली होती, असे इतिहासाच्या तथ्यांची तोडमोड करून छत्रपतींबद्दल वादग्रस्त विधान केले आहे. बागेश्वर बाबा यांच्या या विधानाचे मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस व श्री. मोहन भागवत समर्थन करत आहेत काय, असा प्रश्न मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने उपस्थित केला असून, याबाबतही त्यांनी भूमिका स्पष्ट करावी, असे आवाहन पक्षाने केले आहे. मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी आमदार संजय गायकवाड व कथावाचक बागेश्वर बाबा या दोघांवरही कडक कारवाई करावी, अशी मागणीही मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या वतीने आम्ही करत असल्याचे डॉ. अजित नवले यांनी सांगितले.

# महाराष्ट्र सीईटी २०२६ : स्मार्ट तंत्रज्ञानामुळे परीक्षेला नवे रूप

संगमनेर (प्रतिनिधी)-

महाराष्ट्र राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाने सीईटी २०२६ साठी तंत्रज्ञानावर आधारित अनेक महत्त्वाचे उपाय लागू केले आहेत. यामुळे परीक्षेची प्रामाणिकता, पारदर्शकता आणि कार्यक्षमता मोठ्या प्रमाणात वाढली आहे. आधार/एपीएआर आधारित पडताळणी, चेहऱ्याची ओळख (फेशियल रेकग्निशन) आणि बायोमेट्रिक तपासणी, यांसारख्या आधुनिक तंत्रज्ञानामुळे प्रत्येक टप्प्यावर उमेदवारांची अचूक ओळख सुनिश्चित केली जाते.

तसेच, सर्व परीक्षा केंद्रांवर केंद्रीकृत सीसीटीव्ही देखरेख आणि एकसमान नियमावली लागू केल्यामुळे परीक्षा प्रक्रिया अधिक सुरक्षित आणि गैरप्रकारांपासून मुक्त झाली आहे. या सर्व उपायांमुळे तंत्रज्ञानाच्या मदतीने न्याय्य, पारदर्शक आणि विश्वासार्ह अशी मजबूत परीक्षा प्रणाली तयार झाली आहे.

सीईटी २०२६ ही तंत्रज्ञानाला प्राधान्य देणाऱ्या परीक्षा व्यवस्थेकडे झालेली एक महत्त्वाची पायरी आहे. अत्याधुनिक उपायांचा वापर करून परीक्षेची विश्वासार्हता आणि पारदर्शकता सुनिश्चित करण्यात आली आहे. बायोमेट्रिक आणि चेहऱ्याच्या ओळखीच्या माध्यमातून रिअल-टाइम पडताळणी, तसेच तंत्रज्ञानाधारित देखरेख आणि कडक डिजिटल नियंत्रणामुळे गैरप्रकारांना मोठ्या प्रमाणात आळा बसला आहे.

लाईव्ह सीसीटीव्ही देखरेख, केंद्रीकृत मॉनिटरिंग प्रणाली आणि तक्रार निवारण व हरकती नोंदवण्यासाठी सुलभ डिजिटल प्लॅटफॉर्ममुळे सीईटी प्रक्रिया अधिक पारदर्शक, कार्यक्षम आणि विद्यार्थ्यांसाठी सोयीस्कर झाली आहे. हा तंत्रज्ञानाधारित दृष्टिकोन महाराष्ट्राची सुरक्षित, न्याय्य आणि भविष्यासाठी तयार अशा परीक्षा घेण्याची वचनबद्धता अधिक मजबूत करतो.

# गायकवाड यांची आमदारकी रद्द करा, भाकपची मागणी

अहिल्यानगर

शिवसेना (एकनाथ शिंदे गट) पक्षाचे आमदार संजय गायकवाड यांनी 'शिवाजी कोण होता?' या पुस्तकाच्या संदर्भात आक्षेपार्ह, वादग्रस्त वक्तव्य करून प्रशांत आंबी यांना जीवे मारण्याची धमकी दिल्याच्या आरोपावरून त्यांच्यावर तत्काळ गुन्हा दाखल करून अटक करावी. त्यांची आमदारकी रद्द करावी, अशी मागणी भारतीय कम्युनिस्ट पक्षातर्फे करण्यात आली आहे. भारतीय कम्युनिस्ट पक्षातर्फे आमदार संजय गायकवाड यांच्या आक्षेपार्ह वक्तव्यांच्या विरोधात



जिल्हा पोलिस अधीक्षक कार्यालयासमोर निदर्शने करण्यात आली. त्यानंतर पोलिस उपअधीक्षक दिलीप टिषहसे यांना निवेदन देण्यात आले.

या आंदोलनात पक्षाचे राज्य सचिव ॲड. सुभाष लांडे, ड. सुधीर टोकेकर, प्रशांत पाटील, संध्या मेढे, भैरवनाथ वाकळे, भारती न्यालपेल्ली, संगीता कोंडा, संजय वाघ, फिरोज शेख, संजय झिंजे, अशोक सूर्यवंशी, सुभाष कडलग, सुदाम लगद्ध, विनायक गोरखे, राजू वैराळ, अनिल भोसले, प्रा. डॉ. महेबूब स्रय्यद, सोमनाथ केंजळे, युनूस तांबटकर, प्रवीण सोनवणे, ड. विद्या जाधव आदी सहभागी झाले होते.

या निवेदनात म्हटले आहे, की आमदार संजय गायकवाड यांनी बुधवार (ता. २२) ऑल इंडिया स्टुडंट फेडरेशनचे माजी राज्य सचिव प्रशांत आंबी यांना फोनवरून जीवे मारण्याची धमकी दिली, तसेच आक्षेपार्ह भाषेत शिवीगाळ केल्याचा आरोप करण्यात आला आहे. ही बाब लोकशाही मूल्य व अभिव्यक्ती स्वातंत्र्याला बाधा आणणारी असल्याचे भाकपने स्पष्ट केले आहे. गोविंद पानसरे खून प्रकरणात आमदार गायकवाड यांची सखोल चौकशी करण्यात यावी, नगरमधील नगरसेवक श्रीपाद छिंदम प्रकरणाप्रमाणेच न्याय देत गायकवाड यांची आमदारकी रद्द करण्यात यावी, आणि त्यांच्या सर्व अनधिकृत धंद्यांवर बंदी घालण्याची मागणी भाकपतर्फे करण्यात आली आहे; अन्यथा भारतीय कम्युनिस्ट पक्ष व पुरोगामी संघटनांच्या वतीने राज्यव्यापी आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

**आ. गायकवाडांची दिलगिरी**

शिवाजी कोण होता या पुस्तकाच्या नावाला आपला आक्षेप कायम आहे मात्र आपण प्रकाशक आंबी यांच्या आई पत्नी यांना केलेल्या अपक्षब्दाबाबत दिलगिरी व्यक्त करत आहोत अशी भूमिका आ. संजय गायकवाड यांनी मांडली


## ई निविदा प्रकाशनाची सूचना

महानिर्मिती
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

महानिर्मिती, औ.वि. केंद्र परळी- वै. कडून अनुभवी व नामांकित उत्पादक / पुरवठादार / कंत्राटदारा कडून खालील काम / वस्तूंचा पुरवठा करण्यासाठी ई-निविदा मागविण्यात येत आहेत.

| ई-निविदा क्रमांक | विषय | अंदाजित रक्कम /बयाना रक्कम | ई-निविदा विक्रीचा कालावधी | ई-निविदा स्वीकृत (१२.०० पर्यंत) |
|---|---|---|---|---|
| ई-निविदा क्र ३००००६७८४९ | सप्लाय, इरेक्शन अँड कमिशनिंग ऑफ १०० एमटी इलेक्ट्रॉनिक पिवोट लेस टाइप वे ब्रिज विथ सीमेंट कोंक्रेट अप्रोचेस विथ अलाईड वर्क्स इन दाऊतपुर ॲश बंड एरिया , टीपीएस, परळी वै. | ३१.३६ लाख ३४८६१/- | २५.०४.२०२६ ते ०२.०५.२०२६ | ०३.०५.२०२६ |
| ई-निविदा क्र ३००००६७४६८ (आर) | सप्लाय ऑफ रीक्वायर्ड स्पेयर्स अलॉन्ग विथ रीपेयर अँड इन्स्युलेशन वर्क ऑफ चिमणी स्टॅक ॲट १x २५० मे. वॅट, यू-८, टीपीएस, परळी वै. | १५.६८ लाख १९१८६/- | २५.०४.२०२६ ते १०.०५.२०२६ | ११.०५.२०२६ |
| ई-निविदा क्र ३००००६७४८० (आर) | प्रॉक्युरमेंट ऑफ के टाइप थर्मोकपल केबल अँड अदर केबल्स ॲट आय अँड सी-१, २५० मे. वॅट, टीपीएस, परळी वै. | ६.८८ लाख १०३९०/- | २५.०४.२०२६ ते १०.०५.२०२६ | ११.०५.२०२६ |
| ई-निविदा क्र ३००००६७५०३ (आर) | टू इयर एडब्ल्यूसी फॉर नॉन कॉम्प्रेसिव मेंटेनेंस ऑफ नेटवर्क, सर्वर, नेटवर्क नोडस , प्रिंटर्स , स्कॅनर्स, यूपीएस अँड ॲप्लिकेशन सॉफ्टवेयर ॲट एमआयएस / आयटी, २५०मे.वॅट., टीपीएस, परळी वै. | १९.७० लाख २३२०८/- | २५.०४.२०२६ ते १०.०५.२०२६ | ११.०५.२०२६ |
| ई-निविदा क्र ३००००६७५०९ (आर) | एएमसी फॉर वर्क ऑफ नायट्रोजन फिलिंग, चेकिंग ऑफ क्रिटिकल ॲक्यूम्यलेटर्स ऑफ एचपीसीव्हीएस, आयपीसीव्हीएस, एचपीबीपी, एलपीबीपी अँड सीडब्ल्यू डिस्चार्ज वॉल्वज अलॉन्ग वीथ सप्लाय ऑफ एन २ गॅस सिलिंडर्स ॲट टीएम-२, २५० मे. वॅट, टीपीएस, परळी वै. | ४.०८ लाख ७५८१/- | २५.०४.२०२६ ते १०.०५.२०२६ | ११.०५.२०२६ |
| ई-निविदा क्र ३००००६७५६७ (आर) | प्रॉक्युरमेंट ऑफ एमएसईआरडब्ल्यू पाइप्स फॉर एसीडब्ल्यू कूलिंग लाइन ऑफ व्हेरियस औक्झिलरी ऑफ यू-६ अँड ७ ॲट बीएम-१, २५०मे.वॅट, टीपीएस, परळी वै. | ५.७२ लाख ९२२५/- | २५.०४.२०२६ ते १०.०५.२०२६ | ११.०५.२०२६ |
| ई-निविदा क्र ३००००६७५९० (आर) | वर्क ऑफ रेडियोग्राफी इन्सपेक्शन ऑफ एचपी वेल्डिंग जाइंट्स ऑफ ट्यूब्स इन बॉयलर रीक्वायर्ड ॲट बीएम-२, यू-८, टीपीएस, परळी वै. | १२.६८ लाख १६१८१/- | २५.०४.२०२६ ते १०.०५.२०२६ | ११.०५.२०२६ |
| ई-निविदा क्र ३००००६७७०५ (आर) | प्रॉक्यूरमेंट ऑफ (पॅडस विथ पिस्टन) प्लंजर असेम्ब्ली रीक्वायर्ड फॉर एल & टी मेक एचपी अँड बी अँड एस पंप ऑफ कोल मिल बीबीडी ४७७२ ॲट बीएम-१, २५०मे.वॅट , टीपीएस, परळी वै. | ११.०८ लाख १४५८८/- | २५.०४.२०२६ ते १०.०५.२०२६ | ११.०५.२०२६ |
| ई-निविदा क्र ३००००६७७०९ (आर) | मेंटेनेंस कॉंट्रॅक्ट फॉर सर्विसिंग ऑफ ईओटी क्रेनस इंस्टॉलड ॲट व्हेरियस लोकेशन्स (ॲज अँड व्हेन रीक्वायर्ड बेसिस) ॲट सीएचपी-२, २५० मे. वॅट, टीपीएस, परळी वै. | ११.८२ लाख १५३२४/- | २५.०४.२०२६ ते १०.०५.२०२६ | ११.०५.२०२६ |
| ई-निविदा क्र ३००००६७७२५ (आर) | टू इयर ॲन्युअल वर्क कॉंट्रॅक्ट फॉर मेंटेनेंस ऑफ हायड्रोलिक सिस्टिम इंस्टॉलड ॲट सीएचपी-२, २५०मे.वॅट टीपीएस, परळी वै. | ६१.१४ लाख ६४६४४/- | २५.०४.२०२६ ते १०.०५.२०२६ | ११.०५.२०२६ |
| ई-निविदा क्र ३००००६७७३४ (आर) | ॲन्युअल कंप्रेसिव मेंटेनेंस कॉंट्रॅक्ट फॉर सर्विस बिल्डिंग लिफ्ट विथ लिफ्ट ऑपरेटर इंस्टॉलड ॲट ईएम-२ , टीपीएस, २५० मे. वॅट , टीपीएस, परळी वै. | ४.९३ लाख ८४३४/- | २५.०४.२०२६ ते १०.०५.२०२६ | ११.०५.२०२६ |
| ई-निविदा क्र ३००००६७७५४ (आर) | एएमसी फॉर वर्क ऑफ कंप्लीट रिवायण्डिंग ऑफ ६.६केव्ही एच.टी. मोटर ॲज अँड व्हेन रीक्वायर्ड ॲट ईएम-१, २५०मे.वॅट., टीपीएस, परळी वै | ३५.१७ लाख ३८६७३/- | २५.०४.२०२६ ते १०.०५.२०२६ | ११.०५.२०२६ |
| ई-निविदा क्र ३००००६७७६५ (आर) | वर्क ऑफ एचपी जॉइंट्स रेडियोग्राफी ड्यूरिंग यू-७ एओएच ॲट बीएम-१, २५० मे. वॅट. टीपीएस, परळी वै. | ८.२० लाख ११७०७/- | २५.०४.२०२६ ते १०.०५.२०२६ | ११.०५.२०२६ |
| ई-निविदा क्र ३००००६७५४० | प्रॉक्यूरमेंट ऑफ व्हेरियस एच२ लाइन ड्रायर स्पेयर्स इन यू-७, सीओएच ॲट टीएम-१, २५० मे. वॅट,टीपीएस,परळी वै. | ७.७१ लाख ११२१५/- | २५.०४.२०२६ ते १०.०५.२०२६ | ११.०५.२०२६ |
| ई-निविदा क्र ३००००६७६५८ | वर्क ऑफ इरेक्शन ऑफ कफ लॉक स्केफल्डिंग अँड फरनेस क्लिनिंग बाय जेट मशीन ड्यूरिंग यू-७, एओएच ॲट बीएम-१, २५० मे. वॅट, टीपीएस, परळी वै. | ४४.८६ लाख ४८३३८/- | २५.०४.२०२६ ते १०.०५.२०२६ | ११.०५.२०२६ |
| ई-निविदा क्र ३००००६७७०० | प्रॉक्यूरमेंट ऑफ व्हेरियस स्पेयर्स ऑफ एचपीबीपी मेन वॉल्व अँड एचपीबीपी स्प्रे वॉल्व इन यू-७, सीओएच ॲट टीएम-१, २५० मे. वॅट, टीपीएस, परळी वै. | ११.५० लाख १५००४/- | २५.०४.२०२६ ते १०.०५.२०२६ | ११.०५.२०२६ |
| ई-निविदा क्र ३००००६७३८० | एएमसी फॉर वर्क सूट ब्लोवर्स , स्कॅनर फॅन अँड सॅम्पलिंग कूलर सर्विसिंग इन रनिंग ऑफ यूनिट अँड रीपेयर्स ड्यूरिंग शॉर्ट शटडाउन ॲट यू-८, बीएम, २५० मे. वॅट,टीपीएस,परळी वै. | ३.४८ लाख ६९८२/- | २५.०४.२०२६ ते १७.०५.२०२६ | १८.०५.२०२६ |
| ई-निविदा क्र ३००००६७५३८ | प्रॉक्यूरमेंट ऑफ सक्शण एयर फिल्टर्स फॉर व्हेरियस औक्झिलरी ॲट एएचपी यू-८, टीपीएस, परळी वै. | ४.४८ लाख ७९८२/- | २५.०४.२०२६ ते १७.०५.२०२६ | १८.०५.२०२६ |

वरील तारीखेस ई-निविदा विक्री सुरू होण्याची वेळ ११:०० व ई-निविदा विक्री बंद होण्याची वेळ १६:००, निविदा किंमत व बयाना रक्कम ऑनलाइन पद्धतीने भरावयाची आहे.सर्व निविदा करिता निविदा किंमत रु. ११८०/- (जीएसटी सह) संपर्क व्यक्ती: मुख्य अभियंता, टीपीएस परळी-वैजनाथ. मेल आय डि: parlitpsrp@mahagenco.in, cegenparli@mahagenco.in अधिक माहितीसाठी आणि विक्रेता नोंदणीसाठी आमच्या वेबसाईटला भेट द्याः https://eprocurement.mahagenco.in, SRM help desk E-mail ID etendering.prl@mahagenco.in एस.आर.एम. मदत लाईन क्रमांक ८४११९७१५२५

**मुख्य अभियंता**

# संपादकीय...

## बौद्धिक संपदा : नवोन्मेषाचा कणा आणि भारताचे भविष्य

दरवर्षी २६ एप्रिल रोजी साजरा होणारा वर्ल्ड इंटेलेक्च्यूअल प्रॉपर्टी डे हा दिवस केवळ औपचारिकतेपुरता मर्यादित नसून, ज्ञानाधारित अर्थव्यवस्थेच्या युगात बौद्धिक संपदेचे वाढते महत्त्व अधोरेखित करणारा आहे. वर्ल्ड इंटेलेक्च्यूअल प्रॉपर्टी ऑर्गनायझेशन या आंतरराष्ट्रीय संस्थेने या दिवसाची सुरुवात करून नवोन्मेष, संशोधन आणि सर्जनशीलतेला चालना देण्याचा जागतिक संदेश दिला आहे. आजच्या स्पर्धात्मक आणि तंत्रज्ञानप्रधान जगात कल्पना हीच खरी संपत्ती बनली आहे, आणि त्या कल्पनांचे संरक्षण म्हणजेच बौद्धिक संपदा हक्क हे देशाच्या आर्थिक प्रगतीचे आधारस्तंभ ठरत आहेत. बौद्धिक संपदा म्हणजे मानवी बुद्धिमत्तेतून निर्माण झालेल्या संकल्पना, शोध, कलाकृती, ब्रँड आणि तांत्रिक नवकल्पनांचे कायदेशीर संरक्षण. पेटंट (संशोधन हक्क), कॉपीराइट (प्रताधिकार), ट्रेडमार्क (व्यापारचिन्ह), डिझाईन हक्क (रचना हक्क) या माध्यमातून संशोधक, कलाकार, उद्योजक आणि नवउद्योजकांना त्यांच्या निर्मितीवर हक्क मिळतो. हे हक्क केवळ व्यक्तीच्या कष्टांचे मूल्य जपतात असे नाही, तर नव्या संशोधनासाठी प्रेरणाही देतात. कारण, एखाद्या कल्पनेवर अधिकार असल्याची खात्री मिळाल्यास संशोधक अधिक धाडसी प्रयोग करण्यास तयार होतो. भारतासारख्या विकसनशील देशासाठी बौद्धिक संपदा हक्कांचे महत्त्व अधिक अधोरेखित होते. 'मेक इन इंडिया', 'स्टार्टअप इंडिया', 'डिजिटल इंडिया' यांसारख्या उपक्रमांमुळे देशात नवउद्योजकता आणि संशोधनाचा वेग वाढत आहे. औषधनिर्मिती, माहिती तंत्रज्ञान, शेतीतील नवकल्पना, जैवतंत्रज्ञान या क्षेत्रांमध्ये भारत जागतिक स्तरावर स्पर्धा करत आहे. अशा वेळी संशोधनाचे संरक्षण नसेल, तर कल्पनांची चोरी, बनावट उत्पादनांचा प्रसार आणि आर्थिक नुकसान टाळणे कठीण होईल. तथापि, भारतात अजूनही बौद्धिक संपदा हक्कांविषयी जनजागृतीचा अभाव आहे. अनेक लघुउद्योजक, शेतकरी, कलाकार किंवा नवउद्योजकांना पेटंट (संशोधन हक्क) किंवा व्यापारचिन्ह नोंदणीची प्रक्रिया गुंतागुंतीची आणि खर्चिक वाटते. परिणामी, त्यांच्या कल्पना आणि उत्पादनांना योग्य संरक्षण मिळत नाही. याशिवाय, बनावट वस्तूंचा बाजार मोठ्या प्रमाणावर अस्तित्वात असल्यामुळे मूळ उत्पादकांचे नुकसान होते. ही स्थिती बदलण्यासाठी सुलभ नोंदणी प्रक्रिया, मार्गदर्शन केंद्रे आणि प्रभावी अंमलबजावणी यंत्रणा उभारणे अत्यावश्यक आहे. डिजिटल युगात बौद्धिक संपदेचे स्वरूपही बदलत आहे. इंटरनेट, सामाजिक माध्यमे, कृत्रिम बुद्धिमत्ता यामुळे सामग्रीची निर्मिती आणि प्रसार अतिशय वेगाने होतो. अशा परिस्थितीत प्रताधिकार उल्लंघन, माहिती चोरी, संगणक कार्यक्रमांची पायरेसी यांसारख्या समस्या अधिक तीव्र झाल्या आहेत. त्यामुळे कायद्यांचे आधुनिकीकरण आणि तंत्रज्ञानाधारित संरक्षण प्रणाली विकसित करणे काळाची गरज बनली आहे. बौद्धिक संपदा हक्कांचा उद्देश केवळ संरक्षण देणे नसून नवोन्मेषाला चालना देणे हा आहे. संशोधन आणि उद्योग यांच्यातील दुवा मजबूत झाला, तर देशाची अर्थव्यवस्था अधिक सक्षम होईल. विद्यापीठे, संशोधन संस्था आणि उद्योग क्षेत्र यांच्यातील सहकार्य वाढवून नवकल्पनांना बाजारपेठ उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. यामुळे रोजगारनिर्मिती होईल आणि ज्ञानाधारित अर्थव्यवस्था अधिक बळकट होईल. २६ एप्रिलचा हा दिवस आपल्याला स्मरण करून देतो की, देशाची खरी ताकद नैसर्गिक साधनसंपत्तीपेक्षा मानवी बुद्धिमत्तेत आहे. त्या बुद्धिमत्तेचे संरक्षण, संवर्धन आणि योग्य वापर केल्यास भारत जागतिक पातळीवर ज्ञानसंपन्न राष्ट्र म्हणून उदयास येऊ शकतो. बौद्धिक संपदा ही केवळ कायदेशीर संकल्पना नसून, ती प्रगतीची गुरुकिल्ली आहे-आणि त्या गुरुकिल्लीचा योग्य वापर करणे हीच आजची खरी गरज आहे.

# भटके-विमुक्त समाजाच्या तक्रारींचे जागेवर निवारण

## मंत्री अतुल सावे यांची त्रिस्तरीय समित्यांची माहिती



()-

राज्यातील भटके-विमुक्त समाजाच्या समस्या प्रभावीपणे सोडविणे, त्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना देणे तसेच या समाजावर होणाऱ्या अमानवीय अत्याचारांच्या घटनांना आळा घालण्यासाठी त्रिस्तरीय समित्या स्थापन करण्यात आल्या असल्याची माहिती इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांनी दिली. मंत्री अतुल सावे म्हणाले, राज्यस्तर, जिल्हास्तर आणि उपविभाग स्तरावर समित्यांच्या माध्यमातून भटके-विमुक्त समाजाच्या तक्रारींचे तातडीने निवारण, अत्याचारांच्या घटनांवर त्वरित कारवाई आणि विविध शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी केली जाणार आहे. या निर्णयामुळे समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक विकासाला गती मिळणार असून अत्याचारांच्या घटनांमध्ये घट होण्यास मदत होईल.

राज्यस्तरीय समितीच्या अध्यक्षपदी इतर मागास बहुजन कल्याण मंत्री असतील, तर विभागाचे सचिव सदस्य म्हणून कार्य करतील. संचालक, इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय, पुणे हे सदस्य सचिव म्हणून काम पाहतील. तसेच सहसचिव किंवा उपसचिव यांच्यासह भटके-विमुक्त समाजासाठी कार्य करणाऱ्या सहा अशासकीय सदस्यांची नियुक्ती करण्यात येणार असून त्यात किमान एका महिलेचा समावेश राहील. जिल्हास्तरीय समिती जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली कार्यरत राहील. या समितीत पोलीस आयुक्त किंवा पोलीस अधीक्षक, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा जात पडताळणी अधिकारी तसेच सहाय्यक संचालक (इतर मागास बहुजन कल्याण) यांचा समावेश असेल. याशिवाय भटके-विमुक्त समाजातील चार अशासकीय सदस्यांची नियुक्ती करण्यात येणार असून त्यात किमान एका महिलेचा समावेश राहील.

उपविभाग स्तरावर उपविभागीय अधिकारी किंवा उपजिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली जाईल. या समितीत उपविभागीय पोलीस अधिकारी, तहसीलदार, गटविकास अधिकारी, गटशिक्षण अधिकारी तसेच संबंधित पोलीस ठाण्याचे अधिकारी यांचा समावेश असेल. त्याचबरोबर भटके-विमुक्त समाजातील दोन अशासकीय सदस्यांची नियुक्ती केली जाणार आहे. भटके-विमुक्त समाजावरील अत्याचारांच्या घटनांची तात्काळ दखल घेऊन प्रथम माहिती अहवाल (एफआयआर) नोंदविणे, पीडितांना वैद्यकीय व कायदेशीर मदत उपलब्ध करून देणे आणि योग्य तपास करणे ही समितीची प्रमुख जबाबदारी राहील. समाजात कायदेविषयक जागरूकता वाढविण्यासाठी मार्गदर्शन शिबिरे आयोजित केली जातील. तसेच आरोग्य तपासणी, शासकीय योजनांची माहिती व लाभ देणे, अंधश्रद्धा निर्मूलन आणि समाजात सन्मानपूर्वक वागणूक मिळावी यासाठी जनजागृती केली जाईल. शिक्षणासाठी प्रोत्साहन देणे आणि शैक्षणिक योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले जातील.

भटके-विमुक्त समाजाला रस्ते, वीज, पाणी, घरे यांसारख्या मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी समन्वय साधला जाणार असून रोजगाराभिमुख योजनांद्वारे आर्थिक सक्षमीकरणाला चालना दिली जाईल. वसंतराव नाईक विकास महामंडळाच्या योजनांच्या अंमलबजावणीतही समन्वय ठेवला जाईल. तक्रारींचे निवारण वेळेत व्हावे यासाठी स्पष्ट कार्यपद्धती निश्चित करण्यात आली आहे. प्राप्त तक्रारींवर १० दिवसांत कार्यवाही सुरू करणे बंधनकारक असेल. उपविभाग किंवा जिल्हा स्तरावर कार्यवाही न झाल्यास नागरिकांना राज्यस्तरीय समितीकडे दाद मागता येईल. तसेच जिल्हा व उपविभाग स्तरावर वर्षातून किमान चार बैठका घेणे अनिवार्य करण्यात आले असून समित्यांच्या कामकाजाचा अहवाल नियमितपणे शासनाकडे सादर केला जाणार आहे.

# २०२४ च्या विधानसभा निवडणुकीतील मतदारसंघ निहाय परिशिष्ट ४४ च्या प्रती लवकर उपलब्ध करून द्या

## कोंडविलकरांची मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांना मागणी




मुंबई (प्रतिनिधी)-

मुंबई, दि. २४ एप्रिल.. महाराष्ट्र विधानसभा निवडणूक २०२४ च्या मतदानावर सर्वच स्तरातून आजही शंका व संशय उपस्थित करण्यात येत आहे. लोकांच्या मनातील संभ्रम दूर करण्यासाठी २८८ मतदार संघातील निवडणूक निर्णय अधिकारी यांनी मुख्य निवडणूक अधिकारी महाराष्ट्र राज्य यांना दिलेल्या मतदार संघ निहाय परिशिष्ट ४४ च्या प्रती लवकरात लवकर उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस ड. संदेश कोंडविलकर यांनी केली आहे.

ॲड. कोंडविलकर यांनी आज मंत्रालयात राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोकलिंगम यांची भेट घेऊन त्यांना या संदर्भातील पत्र दिले. पत्रात पुढे असे म्हटले आहे की, विधानसभा निवडणुकीत झालेले मतदान व त्यानंतर जाहीर करण्यात आलेली आकडेवारी यामध्ये मोठी तफावत असल्याचे दिसून आले आहे. काँग्रेस पक्षासह इतर राजकीय पक्ष, सामाजिक संघटनांनी मतदानाच्या आकडेवारीवर शंका उपस्थित केलेल्या आहेत. अनेकांनी निवडणूक आयोगाकडे यासंदर्भात विविध तक्रारीही करण्यात आलेल्या आहेत. विधानसभा निवडणुकीत व्होटचोरीचा नवीन पॅटर्न राबविण्यात आला, अशी जनभावना आहे, त्यामुळे आयोगाने हे परिशिष्ट उपलब्ध करून द्यावेत, असे ड. कोंडविलकर म्हणाले.


SUBSCRIBE DAINIK YUVAVARTA YOUTUBE CHANNEL

Daily Yuvavarta


### जाहीर निवीदा सुचना

माहेश्वरी पंच ट्रस्ट, संगमनेर यांना खालील प्रमाणे बांधकाम करावयाचे आहे. त्याकरीता ट्रस्ट प्रतिथयश कंत्राटदार / ठेकेदारांकडून निवीदा मागवित आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | कामाचे अंदाजे क्षेत्रफळ | टेंडर फॉर्म फी |
|---|---|---|---|
| १ | जुन्या राजस्थान चित्र मंदीर मेनरोड या जागेवरील शॉपिंग कॉम्प्लेक्स इमारतीचे बांधकाम | ७००० चौ. फुट | २०००/- Non Refundable |

१) टेंडर फॉर्म कामकाजाच्या वेळेत माहेश्वरी पंच ट्रस्टच्या कार्यालयात श्री. अजय दिलीप चायल मो.नं. ९६८९९८९६२७ यांचेकडे मिळतील.

२) निवीदा फॉर्म सोमवार दिनांक २७/०४/२०२६ सकाळी १० पासून उपलब्ध होतील.

३) निवीदा फॉर्म जमा करण्याची अंतिम तारीख शनिवार दिनांक ०२/०५/२०२६ सायं ५.०० वाजेपर्यंत राहिल.

४) निवीदा मंजूर अथवा नामंजुर करण्याचा अधिकार ट्रस्टने राखुन ठेवला आहे.


CHANGE IN NAME

I HAVE CHANGED MY OLD NAME ASHWINI DHIRAJ JORVEKAR

TO NEW NAME AS ASHVINI DHIRAJ JORVEKAR

ADD- NASHIK PUNA RODE, AT/PO - SANGAMNER KH, TEL - SANGAMNER, SANGAMNER, DIST - AHILYANAGAR, MAHARASHTRA -422605

CorelDRAW Ps Ai Id

WE ARE HIRING JOIN OUR TEAM

GRAPHIC DESIGNER

Send Resume on Whatsapp

Contact : 7720046005









dh We treat He cure's

धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल

डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४

डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४

उपलब्ध सुविधा: मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा, स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी

महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत डायलेसिस सुविधा उपलब्ध

या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे

धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

युवावार्ता परिवर्तनाचा पुरस्कर्ता

पाहिजेत

अकाऊंटंट | जागा ०२

टॅली ईआरपी ९ चे ज्ञान आवश्यक, अकौंट, बँक, रिपोर्ट जनरेशन, सॅलरी, जीएसटी, रिकव्हरी आदींचे सखोल ज्ञान आवश्यक, अनुभव : ३ वर्षे

आकर्षक पगार व इतर सुविधा

बायोडाटा पाठवा - ९८२२०३९४६०

dailyyuvavarta@gmail.com

वाटचाल तीन दशकांची

जाहिरात छोटी सुवर्णसंधी मोठी

We Are Hiring SANGAMNER

Marketing Team

SLH Tax Advisors Pvt Ltd

Marketing Manager - 1 (25k to 50k+ Incentive)

Marketing Executive - 5 (20k to 35k + Incentive)

Digital Marketing - 1 (15k to 25k + Incentive)

Telecaller (Female) - 1 (15k to 20k + Incentive)

Salary + Incentives

Fast Growth Opportunity

Address - SLH Advisors Pvt Led, Saish Business Park,Behind Joshi Palace, Sangamner

Call/WhatsApp- 7264804000

पाहिजेत

मसाज थेरपिस्ट १ जागा (पुरुष)

फिजिओथेरपिस्ट १ जागा (पुरुष)

रुग्णांचा काळजी घेणारे काका आणि मावशी

सप्तश्रृंगी हॉस्पिटल अॅण्ड पॅरालिसिस सेंटर, मुक्ताई मंदिराजवळ, रायते-वाघापूर, ता. संगमनेर, जि- अहिल्यानगर

9657230023

पाहिजेत

श्री गणेश डिस्ट्रीब्युटर्स, दिल्ली नाका संगमनेर या फर्मसाठी

अकाउंटंट - १ जागा (बी. कॉम/ टॅली)- पुरुष

सेल्समन - १ जागा (वय वर्ष २२ ते ३२)

पगार - १४०००+ इन्सेंटिव्ह

बी.बी.ए./ एम.बी.ए. प्राधान्य

8999862759

पाहिजेत

मुलगा/ पुरुष कर्मचारी

आकर्षक पगार

श्री विश्वगंध आयुर्वेद हॉस्पिटल नवीन नगर रोड संगमनेर

Biodata सह भेटणे

9822283079

पाहिजेत

राजवीर फार्मा

मेडीकल एजन्सी कामाकरिता फक्त गरजुंनी संपर्क साधावा

मार्केटिंग - १ जागा

दुकानकामासाठी - ०२

रविवार सुट्टी असते

आकर्षक पगार व बोनस

ठिकाण- जाणता राजा रोड, मुथुट फासनान्स पाठीमागे, २ नं गल्ली, संगमनेर

8669184141

हेल्पर पाहिजे

साईकृपा एंटरप्राईजेस

कामासाठी हेल्पर पाहिजे

पत्ता- मालपाणी मल्टिप्लेक्स समोर, संगमनेर

9767059977

पाहिजेत

डॉक्टर्स ०२- महिला (बी.ए.एम.एस/एम.डी.)

पंचकर्म थेरपिस्ट - ४ (स्त्री/पुरुष) ट्रेनिंग दिले जाईल

रिसेप्शनिस्ट - २ (महिला) कॉम्प्युटर ज्ञान आवश्यक

ओ. टी. ॲसिस्टंट - १ (पुरुष)

माधवबाग क्लिनिक ९३२५०२८६८६

पाहिजेत

स्पेशल सिक्युरिटी फोर्स व बाऊन्सर सर्विसेस

सिक्युरिटी गार्ड - ५

महिला - ३

सफाई कर्मचारी - ५

हेल्पर - ५

पार्ट टाइम /फुल टाइम काम मिळेल ( सेक्युरिटी गार्ड

संपर्क - तिरंगा चौक, मालदाड रोड, संगमनेर

7709828846

READ E- NEWS ON Yuvavarta.in

VISIT INSTAGRAM daily_yuvavarta


दैनिक युवावार्ता कार्यालय, संगमनेर,०२४२५- २२५१२९ ७६२०३८८२३०, ८३८०९५६६०४, ८८३०५०८२४४

वाचकांसाठी निवेदन- सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो, यातील कोणत्याही माहितीच्या,व्यवहाराच्या सत्यतेबाबत 'दैनिक युवावार्ता व्यवस्थापन' हमी देऊ शेत नाही, याची नोंद घ्यावी

# अशोक खरातकडून अवतारपूजेच्या नावाखाली ८ कोटींची फसवणूक; नवा गुन्हा दाखल

नाशिक (प्रतिनिधी)-

भोंदूगिरी आणि विविध गंभीर आरोपांमुळे आधीच चर्चेत असलेल्या अशोक खरात याच्या अडचणीत आणखी भर पडली आहे. एका चार्टर्ड अकाउंटंटची ८ कोटी ७६ लाख रुपयांची फसवणूक केल्याचा आरोप समोर आला असून, या प्रकरणी नाशिकमधील सरकारवाडा पोलिस ठाण्यात नवीन गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेमुळे खरातच्या कारवायांबाबत पुन्हा एकदा खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पीडित सीए ललित पोफळे हे खरातच्या ट्रस्टशी संबंधित होते आणि ते विश्वस्त म्हणून काम पाहत होते. त्यामुळे ट्रस्टच्या आर्थिक व्यवहारांची त्यांना सखोल माहिती होती. याच ओळखीचा फायदा घेत, खरातने त्यांना त्यांच्या आई-वडिलांच्या मृत्यूचा योग असल्याचे सांगून घाबरवले. या भीतीतून सुटका करण्यासाठी अवतारपूजा करण्याचा सल्ला देत, त्यांच्याकडून टप्प्याटप्प्याने कोट्यवधी रुपये उकळल्याचा आरोप आहे.

पोफळे यांची याआधी पोलिसांनी चौकशी केली असता, खरातच्या आर्थिक व्यवहारांबाबत महत्त्वाची माहिती उघड झाली होती. या प्रकरणात मोठ्या आर्थिक गैरव्यवहाराचे धागेदोरे समोर येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. ट्रस्टमधील आर्थिक हालचाली आणि पैशांचा वापर याबाबत अधिक तपास सुरू असून, या नव्या गुन्ह्यामुळे संपूर्ण रॅकेट उघडकीस येण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

दरम्यान, अशोक खरातविरोधातील गुन्ह्यांची मालिका वाढतच चालली आहे.



आतापर्यंत त्याच्यावर लैंगिक शोषणाचे ८ आणि आर्थिक फसवणुकीचे ९ गुन्हे नोंदवले गेले आहेत. धर्म आणि अध्यात्माच्या नावाखाली लोकांची फसवणूक करणे आणि महिलांचे शोषण करणे, हीच त्याची कार्यपद्धती असल्याचे तपासात समोर आले आहे. सरकारवाडा पोलिसांनी या प्रकरणाचा तपास अधिक गतीने सुरू केला आहे.

या सर्व प्रकरणांच्या पार्श्वभूमीवर, खरातला न्यायालयात हजर करण्यात आले होते. महिला अत्याचाराच्या सहाव्या गुन्ह्यात विशेष तपास पथकाने त्याचा ताबा घेतला असून, न्यायालयाने त्याला २६ एप्रिलपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे. कॅनडा कॉर्नर परिसरातील कार्यालयात एका महिलेला गुंगीचे पदार्थ देऊन तिच्यावर अत्याचार केल्याचा गंभीर आरोप त्याच्यावर आहे. सरकारी वकिलांनी तपासासाठी कोठडीची मागणी केली असताना, खरातच्या वकिलांनी त्याला विरोध केला होता. मात्र, सर्व युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने पोलिस कोठडी मंजूर केली. आता या प्रकरणात आणखी कोणते धक्कादायक तपशील समोर येतात आणि तपासात कोणती नवीन माहिती उघड होते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# नाशिक कलावंत मंच पुरस्कार अभिनेते ज्ञानदेव शिंदे यांना प्रदान



संगमनेर

(युवावार्ता प्रतिनिधी)-

संगमनेर तालुक्यातील चणेगाव येथील अभिनेता ज्ञानदेव नरहरी शिंदे यांना नुकताच नाशिक येथे कलावंत विचार मंच कमल फिल्म प्रोडक्शन आणी कमल म्युझिक मराठी यांच्या संयुक्त विद्यमाने नाशिक येथे कलावंत पुरस्कार अध्यक्ष सुनील मोंढे यांच्या हस्ते समारंभपूर्वक प्रदान करण्यात आला.

या पुरस्कार वितरण सोहळा प्रसंगी जेष्ठ साहित्यिक सुभाष सोनवणे,अभिनेत्री दिपाली कुलकर्णी, प्रा.सोमनाथ मुठाळ, कवीयत्री सुनीता वाळुंज हे उपस्थित होते अभिनेते ज्ञानदेव शिंदे यांनी कलावंत पुरस्कार नाशिक येथे स्वीकारला यावेळी महाराष्ट्राचे अनेक कलावंतांना पुरस्कार देण्यात आले प्रसंगी अनेक मान्यवर उपस्थित होते.

# सहा विद्यार्थी जेईई अ‍ॅडव्हॉन्ससाठी पात्र

## प्रीतिसुधाजी ज्युनिअर कॉलेजची कामगिरी

राहाता

(युवावार्ता प्रतिनिधी)-

प्रीतिसुधाजी ज्युनिअर कॉलेजमधील विद्यार्थ्यांनी जेईई मेन परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले. या महाविद्यालयातील सहा विद्यार्थी जेईई अ‍ॅडव्हॉन्ससाठी पात्र ठरले. शिक्षक आणि विद्यार्थ्यांचे हे यश आहे, अशी माहिती प्राचार्य ज्ञानेश डांगे यांनी दिली.

ते म्हणाले, या विद्यार्थ्यांत अथर्व महाजन (९७.५४), आदित्य राहिंज (८७), श्रेया गिधाड (८४), रूपम दास (७१), श्रद्धा नन्हाई (७०), ओम वारकर (६८) पर्सेंटाईल गुण मिळविलेल्या विद्यार्थ्यांचा समावेश आहे. संकल्पनाधारित अध्यापन आणि स्पर्धा परीक्षांसाठी विशेष मार्गदर्शन, याचा विद्यार्थ्यांना लाभ झाला. संस्थेच्या अध्यक्षा स्नेहलता डांगे, उपाध्यक्ष शशिकांत डांगे, डॉ. पांडुरंग गुंजाळ, डॉ. मधुकर देशमुख, डायरेक्टर पूनम डांगे, कार्याध्यक्ष भगवानराव डांगे, निवृत्त पोलिस अधिकारी मेघश्याम डांगे, शिवाजी देवढे यांनी अभिनंदन केले. यशस्वी विद्यार्थ्यांना विकास कानगुडे, ओमश्री भालदंड, अजय सानप, श्याम गंगावणे, राहुल भदाने, रमेश लहारे, आदित्य वाणी, महेश बोर्डे, अक्षय पंडित, अक्षदा शेळके, भारती डेंगळे, रोहन लोखंडे, सुदर्शन जावळे आदींचे मार्गदर्शन लाभले.

प्रीतिसुधाजी ज्युनिअर कॉलेजच्या सहा विद्यार्थ्यांनी मिळवलेले हे यश शिक्षकांचा उत्साह वाढविणारे आहे. विविध स्पर्धा व प्रवेश परीक्षांची तयारी करण्यासाठी संस्थेच्या वतीने नियोजनबद्ध प्रयत्न केले जातात, त्याचे हे फलीत आहे.

ज्ञानेश डांगे, प्राचार्य,

# एसएमबीटी हॉस्पिटलमध्ये दोन वर्षांत २१ हजार रुग्णांवर मेंदू आणि मणकेविकार उपचार, शासकीय योजनेतून रुग्णांना लाभ

(प्रतिनिधी)-

मेंदू आणि मणक्याचे विकार हे अत्यंत गंभीर आणि खर्चिक मानले जातात. मात्र, उत्तर महाराष्ट्रातील गोरगरीब रुग्णांना या व्याधींतून मुक्त करण्यासाठी नाशिक जिल्ह्यातील एसएमबीटी हॉस्पिटल एक आशेचा किरण ठरले आहे. गेल्या दोन वर्षांत या विभागाने डॉ. हितेंद्र गडकरी यांच्या नेतृत्वाखाली २१ हजारांहून अधिक रुग्णांची मोफत तपासणी व सल्ला मार्गदर्शन केले. विशेष म्हणजे, या कालावधीत ७०० पेक्षा अधिक यशस्वी शस्त्रक्रिया पार पडल्या. या सर्वच शस्त्रक्रिया या अतिशय क्लिष्ट आणि गुंतागुंतीच्या स्वरूपाच्या यशस्वी करण्यात आल्याचे डॉ हितेंद्र गडकरी यांनी सांगितले. प्रख्यात मेंदू आणि मणकेविकार तज्ज्ञ डॉ. हितेंद्र गडकरी यांनी केवळ समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना परवडेल अशा दरात आरोग्यसेवा मिळावी, या उदात्त हेतूने दोन वर्षांपूर्वी एसएमबीटी हॉस्पिटलमध्ये पदभार स्वीकारला. डॉ. गडकरी यांना मेंदू आणि मणकेविकार शस्त्रक्रियांचा ३० वर्षांपेक्षा अधिक दांडगा अनुभव आहे. नाशिक, पुणे, मुंबई, जळगाव आणि गुजरातमध्ये त्यांनी सेवा बजावली असून,



डॉ. हितेंद्र गडकरी

एसएमबीटी हॉस्पिटल

काही वर्षे त्यांनी परदेशातही आपल्या कौशल्याचा ठसा उमटवला आहे. त्यांच्या या प्रदीर्घ अनुभवाचा फायदा आज दुर्गम भागातील रुग्णांना मिळत आहे.

एसएमबीटी येथील उपचार पद्धतीवर विश्वास ठेवून केवळ उत्तर महाराष्ट्रातूनच नव्हे, तर भिवंडी, शहापूर, ठाणे, छत्रपती संभाजीनगर, जुन्नर आणि पुणे परिसरातील तज्ज्ञ डॉक्टरांनी आपले रुग्ण याठिकाणी रेफर केले आहेत. अत्यंत गुंतागुंतीच्या शस्त्रक्रिया यशस्वीपणे पार पडत असल्याने वैद्यकीय क्षेत्रात या केंद्राबद्दल मोठी विश्वासार्हता निर्माण झाली आहे. मेंदू आणि मणक्याच्या शस्त्रक्रियांचा खर्च लाखांच्या घरात असतो. मात्र, एसएमबीटीमध्ये हे उपचार शासकीय योजनांमध्ये समाविष्ट असल्याने रुग्णांना कोणताही आर्थिक भार सोसावा लागत नाही. पैशाअभावी कोणाचेही उपचार थांबू नयेत, हे रुग्णसेवेचे ब्रीद याठिकाणी प्रत्यक्षात उतरताना दिसत आहे.

एसएमबीटी हॉस्पिटलमध्ये डॉ. गडकरी यांच्या मार्गदर्शनाखाली अत्यंत क्लिष्ट आणि आव्हानात्मक शस्त्रक्रिया यशस्वीपणे पार पाडल्या जात आहेत. यामध्ये प्रामुख्याने मेंदूतील गाठी काढणे (ड्डीरळप ढींी), मेंदूतील रक्तवाहिनी फुगल्यास केली जाणारी 'अ‍ॅन्युरिझम क्लिपिंग', मणक्यातील गादी सरकल्याने नसांवर येणारा दाब काढण्याची 'मायक्रो-डिसेक्टोमी' आणि पाठीच्या कण्याला आधार देणारी 'स्पाइनल फिक्सेशन' यांसारख्या अवघड शस्त्रक्रियांचा समावेश आहे. विशेष म्हणजे, या सर्व महागड्या शस्त्रक्रिया 'आयुष्मान भारत' योजने'अंतर्गत समाविष्ट असल्याने रुग्णांना त्या मोफत उपलब्ध होत आहेत. अपघातामुळे डोक्याला झालेली गंभीर दुखापत असो किंवा मणक्याचे फ्रॅक्चर, शासकीय योजनेच्या आधारामुळे गरीब व मध्यमवर्गीय रुग्णांना लाखांचा आर्थिक भार सोसावा न लागता जागतिक दर्जाचे उपचार मिळत आहेत. यामुळेच गुंतागुंतीच्या आजारांसाठी हे रुग्णालय आता उत्तर महाराष्ट्रातील एक हक्काचे केंद्र बनले आहे.

शस्त्रक्रिया यशस्वी होण्यासाठी केवळ तज्ज्ञ डॉक्टर असून चालत नाही, तर तिथली व्यवस्थाही तितकीच महत्त्वाची असते. एसएमबीटीमध्ये २०० पेक्षा अधिक आयसीयू बेड्स, १७ अत्याधुनिक मॉड्युलर ऑपरेशन थिएटर्स आणि मेंदू व मणक्याच्या रुग्णांसाठी स्वतंत्र सुसज्ज अतिदक्षता विभाग उपलब्ध आहेत. या रुग्णांची काळजी घेण्यासाठी विशेष प्रशिक्षित सपोर्टिंग आणि नर्सिंग स्टाफ उपलब्ध आहे, ज्यामुळे आजार बरे होण्याचे प्रमाण अधिक असून रुग्ण लवकर डिस्चार्ज घेऊन घरी परतत आहेत.

# पश्चिमेच्या पाण्यासाठी प्रतिज्ञापत्र सादर करण्यास शेवटची संधी - न्यायालयाचा इशारा

मुंबई (प्रतिनिधी)-

पश्चिमेकडील सह्याद्री घाटमाथ्यावरील पाणी गोदावरीच्या तुटीच्या खोऱ्यात वळविण्यासंदर्भात दाखल जनहित याचिकेत केंद्र व राज्य सरकारने दुर्लक्ष केल्याने मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने नाराजी व्यक्त केली आहे. न्यायमूर्ती विभा कांकणवाडी आणि न्यायमूर्ती अजित कडेठाणकर यांनी सरकारला प्रतिज्ञापत्र सादर करण्यासाठी ८ मे २०२६ पर्यंत अखेरची संधी देत आवश्यक आर्थिक तरतूद व वेळेत काम पूर्ण करण्याचे निर्देश दिले आहेत. या निर्णयामुळे शेतकरी संघटना व निळवंडे कालवा कृती समितीने समाधान व्यक्त केले आहे.

शेतकरी संघटनेचे नानासाहेब जवरे आणि रूपेंद्र काले यांनी जानेवारी २०२४ मध्ये ही जनहित याचिका दाखल केली होती. यापूर्वी न्यायालयाने प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे आदेश दिले होते, मात्र त्याची अंमलबजावणी झाली नव्हती. सुनावणीदरम्यान ड. अजित काळे यांनी सरकारच्या निष्क्रियतेकडे लक्ष वेधत हा प्रश्न शेतकऱ्यांसाठी अत्यंत महत्त्वाचा असल्याचे नमूद केले.

अभ्यासानुसार कोकणातील नार-पार, दमणगंगा, वैतरणा व उल्हास नदी खोऱ्यातील अतिरिक्त पाणी गोदावरी खोऱ्यात वळविण्याची योजना असून सुमारे ८९.९२ टीएमसी पाणी वळविण्याची शिफारस करण्यात आली आहे. यामुळे निळवंडे धरणासह नगर, नाशिक आणि मराठवाडा भागातील सिंचनास मोठा फायदा होण्याची अपेक्षा आहे. या योजनेअंतर्गत प्रवाही वळण आणि उपसा वळण अशा दोन्ही प्रकारच्या प्रकल्पांचा समावेश असून, काही कामे सुरू असल्याचे सांगितले जात असले तरी प्रगतीचा वेग अत्यंत कमी असल्याची टीका करण्यात येत आहे. दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या या योजनेकडे निवडणुकांच्या पार्श्वभूमीवरच लक्ष दिले जाते, अशीही भावना व्यक्त करण्यात आली आहे.

निळवंडे धरणाच्या लाभक्षेत्रात पाणी उपलब्ध झाल्यास शेतीला मोठा दिलासा मिळणार असून, दुष्काळी भागातील शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढण्यास मदत होईल. मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्रातील पाणीटंचाई कमी करण्यासाठी ही योजना महत्त्वाची मानली जात आहे. दरम्यान, न्यायालयाच्या आदेशानुसार सरकारने निश्चित मुदतीत प्रतिज्ञापत्र सादर करणे बंधनकारक असून, त्याची प्रत याचिकाकर्त्यांना देणे आवश्यक आहे. पुढील सुनावणी ८ जून रोजी होणार आहे. या निर्णयाचे विविध शेतकरी संघटना आणि कार्यकर्त्यांनी स्वागत केले असून, लवकरात लवकर प्रत्यक्ष कामाला गती मिळावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# 'पुढच्यास ठेच, मागचा शहाणा' म्हणीचा प्रत्यय


## स्वस्तिक महाराज संस्थेकडून अंधश्रद्धाविरुद्ध सूचना

संगमनेर

(युवावार्ता प्रतिनिधी)

राज्यात अंधश्रद्धा, भोंदूगिरी आणि चमत्कारांच्या नावाखाली होणाऱ्या फसवणुकीच्या घटना दिवसेंदिवस वाढत असल्याच्या पार्श्वभूमीवर उंबरी बाळापूर (ता. संगमनेर) येथील स्वस्तिक महाराज सेवाभावी संस्था पुढे सरसावली आहे. संस्थेचे प्रमुख डोके महाराज उर्फ स्वस्तिक महाराज यांनी अंधश्रद्धेविरोधात जनजागृती करण्यासाठी महत्त्वपूर्ण सूचना प्रसिद्ध केली आहे.

महाराष्ट्र शासनाने राज्यात लागू केलेल्या महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन व काळी जादू प्रतिबंधक कायदा २०१३ नुसार कोणत्याही धार्मिक विधी, पूजा किंवा कर्मकांडातून निश्चित लाभ, चमत्कार घडणे, आजार बरा होणे किंवा इतर परिणाम होतात असा दावा करणे हा कायद्याने गुन्हा आहे. या कायद्याची जाणीव ठेवत संस्थेने आपल्या परिसरात स्पष्ट सूचना लावून भाविकांना जागरूक करण्याचा प्रयत्न



सूचना (Notice):

महाराष्ट्र राज्यात लागू असलेल्या महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन व काळी जादू प्रतिबंधक कायदा 2013 नुसार कोणत्याही धार्मिक विधी, पूजा, किंवा कर्मकांडामुळे निश्चित लाभ, चमत्कार, आजार बरा होणे किंवा इतर परिणाम होतात असा दावा करणे कायद्याने गुन्हा आहे.

त्यामुळे सर्व भाविकांना नम्र विनंती करण्यात येते की, येथे करण्यात येणारे सर्व धार्मिक विधी हे केवळ वैयक्तिक श्रद्धा आणि आध्यात्मिक समाधान यासाठी आहेत. कोणत्याही प्रकारचा हमखास लाभ किंवा परिणाम याबाबत संस्था कोणताही दावा करत नाही.

ज्या भाविकांना श्रद्धा आहे त्यांनी स्वेच्छेने पूजा/विधी करून [illegible].

केला आहे.

संस्थेकडून प्रसिद्ध करण्यात आलेल्या सूचनेत नमूद केले आहे की, येथे करण्यात येणारे सर्व धार्मिक विधी हे केवळ वैयक्तिक श्रद्धा आणि आध्यात्मिक समाधानासाठी आहेत. कोणत्याही प्रकारचा हमखास लाभ किंवा परिणाम मिळेल, असा दावा संस्था करत नाही. त्यामुळे भाविकांनी स्वतःच्या इच्छेनुसार व स्वेच्छेनेच पूजा-विधी करून घ्यावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

गेल्या काही दिवसांत राज्यभर अनेक तथाकथित बाबा, महाराज यांच्या गैरकृत्यांचे प्रकार उघडकीस येत असून काहींना तुरुंगाची हवा खावी लागली आहे. या घटनांमुळे समाजात संतापाची लाट उसळली असून अंधश्रद्धेविरोधात कठोर भूमिका घेण्याची गरज अधोरेखित झाली आहे. पुढच्यास ठेच, मागचा शहाणा या उक्तीप्रमाणे स्वस्तिक महाराज संस्थेने घेतलेले हे पाऊल समाजासाठी दिशादर्शक ठरत आहे.

या उपक्रमामुळे धार्मिक क्षेत्रात पारदर्शकता वाढण्यास मदत होणार असून भाविकांमध्येही जागरूकता निर्माण होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. अंधश्रद्धेच्या विळख्यात अडकण्यापेक्षा विवेकाने श्रद्धा जोपासण्याचा संदेश या सूचनेतून देण्यात आला आहे.

# हवामान बदलाचा आरोग्यावर वाढता प्रहार

हवामान बदल हा आज जगभर मानवी आरोग्यासमोरील सर्वात गंभीर संकटांपैकी एक ठरत आहे. सुमारे ३.६ अब्ज लोक अशा भागांत राहतात, जिथे हवामान बदलाचे परिणाम तीव्र स्वरूपात जाणवत आहेत आणि त्यामुळे थेट व अप्रत्यक्ष आरोग्य समस्या वाढत आहेत. उष्णतेच्या लाटा, अतिवृष्टी, वादळे, पूर आणि वाढते प्रदूषण यांचा परिणाम म्हणून मृत्यूचे प्रमाण वाढत आहे, तर अन्नप्रणाली विस्कळीत होत पोषणावरही परिणाम होत आहे. झूनोसिसचे प्रमाण वाढत असून, पाणी, अन्न आणि कीटकांद्वारे पसरणारे आजार अधिक तीव्र होत आहेत. जागतिक आरोग्य संघटनेच्या अंदाजानुसार २०३० ते २०५० दरम्यान दरवर्षी सुमारे २.५ लाख अतिरिक्त मृत्यू हवामान बदलामुळे होऊ शकतात, तर आरोग्यावरील थेट आर्थिक भार अब्जावधी डॉलर्सपर्यंत जाऊ शकतो.



या संकटाचा सर्वाधिक फटका आधीच असुरक्षित असलेल्या घटकांना बसत आहे. महिला, मुले, वृद्ध, अल्पसंख्याक, स्थलांतरित आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल समाज यांना हवामानाशी संबंधित आजारांचा जास्त भार सहन करावा लागत आहे. यामुळे आरोग्य क्षेत्रातील असमानता वाढण्याबरोबरच दारिद्र्यनिर्मूलन आणि विकासाच्या प्रयत्नांनाही धक्का बसत आहे. ज्या भागांमध्ये आरोग्य सुविधा कमकुवत आहेत, तेथे या संकटाला तोंड देण्याची क्षमता अत्यंत मर्यादित आहे.

भारतामध्येही ही स्थिती चिंताजनक आहे. अभ्यासानुसार अलीकडील काळात अतिवृष्टी, उष्णतेच्या लाटा आणि इतर टोकाच्या हवामान घटनांमुळे मृत्यूंमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. अनेक राज्यांत अशा घटना वर्षातील बहुतांश दिवस नोंदल्या जात असून हजारो लोकांचा बळी गेला आहे. त्याचबरोबर तापमानाशी संबंधित मृत्यूंचे प्रमाणही वाढले आहे. वायूप्रदूषणाच्या बाबतीत भारत जगातील अग्रस्थानी असून, राजधानी दिल्लीसारख्या शहरांत मृत्यूंपैकी मोठा टक्का प्रदूषणाशी संबंधित आहे. स्वच्छ पाणी आणि स्वच्छतेच्या अभावामुळेही दरवर्षी मोठ्या प्रमाणावर मृत्यू होत असून, आगामी काळात पाणीटंचाईचा धोका अधिक गडद होण्याची शक्यता आहे.

हवामान बदलाचे अप्रत्यक्ष परिणामही गंभीर आहेत. डेंग्यूसारख्या आजारांचा प्रसार करणाऱ्या डासांची क्षमता वाढत असून, समुद्राच्या तापमानवाढीमुळे किनारी भागांत जलजन्य रोगांचा धोका वाढत आहे. या पार्श्वभूमीवर भारताची आरोग्य व्यवस्था अधिक सक्षम करणे अत्यावश्यक ठरते. केंद्र सरकारने राष्ट्रीय हवामान बदल व मानवी आरोग्य कार्यक्रम सुरू करून काही सकारात्मक पावले उचलली असली, तरी या उपक्रमांची अंमलबजावणी अजून प्राथमिक टप्प्यात आहे. राज्यस्तरीय कृती आराखडे तयार करण्यात आले असले, तरी स्थानिक पातळीवरील समन्वय, निधी आणि अंमलबजावणी यामध्ये अनेक त्रुटी दिसून येतात.

आरोग्य व्यवस्थेची लवचिकता वाढविणे ही काळाची गरज आहे. टोकाच्या हवामान घटनांसाठी लवकर इशारा प्रणाली, प्रशिक्षित आरोग्य कर्मचारी, सुसज्ज रुग्णालये आणि औषधांचा अखंड पुरवठा यावर भर देणे आवश्यक आहे. हवामान बदलाचा सर्वाधिक परिणाम होणाऱ्या भागांची ओळख करून त्यांना प्राधान्य देणे आणि स्थानिक परिस्थितीनुसार आरोग्य अनुकूलन योजना तयार करणे गरजेचे आहे. त्यासाठी जिल्हा, राज्य आणि केंद्र स्तरावर प्रभावी समन्वय व संवाद आवश्यक आहे.

हवामान नियोजनात आरोग्याला केंद्रस्थानी स्थान देणे ही केवळ सार्वजनिक आरोग्याची नव्हे, तर आर्थिक आणि विकासात्मक गरज आहे. वाढत्या हवामान धोक्यांच्या पार्श्वभूमीवर जीवितांचे संरक्षण, उत्पादकता टिकवून ठेवणे आणि सामाजिक समता जपणे यासाठी आरोग्य क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक करणे अपरिहार्य आहे. हवामान बदलाच्या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी भारताने आरोग्य व्यवस्थेला अधिक सक्षम, लवचिक आणि समावेशक बनविण्याचा ठोस मार्ग अवलंबणे हीच काळाची गरज आहे.

# फडणवीस- ठाकरेंमध्ये वर्षावर...

(पान नं. ०१ वरुन)

गेल्या काही वर्षांपासून ठाकरे आणि फडणवीस यांच्यातील संबंध ताणलेले असल्याचे दिसून आले होते. २०१९ साली मुख्यमंत्रीपदावरून झालेल्या वादानंतर शिवसेना आणि भाजप यांच्यातील युती तुटली. त्यानंतर ठाकरे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेससोबत मिळून महाविकास आघाडी स्थापन केली. या राजकीय बदलामुळे राज्यातील समीकरणे पूर्णपणे बदलली होती. मात्र, अलीकडच्या काळात दोन्ही नेत्यांमध्ये थेट संवाद नसला तरी अप्रत्यक्ष सुसंवादाची चिन्हे दिसू लागली होती. याच पार्श्वभूमीवर विधान परिषद निवडणुकीची घोषणा झाल्यानंतर राजकीय हालचालींना वेग आला आहे. १२ मे रोजी होणार्या मतदानाच्या आधी विविध पक्षांकडून रणनीती आखली जात आहे. अशा परिस्थितीत ठाकरे-फडणवीस भेटीचा दावा समोर आल्याने ही केवळ औपचारिक भेट आहे की मोठ्या राजकीय समीकरणांची सुरुवात, यावर चर्चा सुरू झाली आहे. दरम्यान, काही दिवसांपूर्वी विधान परिषदेतील निवृत्त होणार्या सदस्यांच्या कार्यक्रमात दोन्ही नेत्यांनी एकमेकांशी संवाद साधत शेरोशायरीही केली होती. या प्रसंगी त्यांनी परस्पर आदर व्यक्त केला होता. त्यामुळे, दोघांमध्ये संवादाची दारे पूर्णपणे बंद नाहीत, असे संकेत मिळाले होते. या पार्श्वभूमीवर मध्यरात्रीच्या भेटीचा दावा अधिकच महत्त्वाचा मानला जात आहे. राजकीय विश्लेषकांच्या मते, या भेटीचा संबंध विधान परिषद निवडणुकीशी असण्याची शक्यता नाकारता येत नाही. एका अंदाजानुसार, ठाकरे हे विधान परिषदेसाठी इच्छुक नसल्याचे बोलले जात आहे. जर त्यांनी निवडणूक लढवली नाही, तर महाविकास आघाडीच्या गणितांवर परिणाम होऊ शकतो. अशा परिस्थितीत महायुतीला अतिरिक्त फायदा मिळण्याची शक्यता आहे. दुसरीकडे, काही तज्ज्ञांचे मत असेही आहे की, एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेला राजकीय उत्तर देण्यासाठी ठाकरे यांची विधान परिषदेत उपस्थिती भाजपसाठीही फायदेशीर ठरू शकते. त्यामुळे या भेटीमागे राजकीय समन्वयाचा प्रयत्न असू शकतो, अशी शक्यता व्यक्त केली जात आहे.

पॅनल
देणे आहे

दैनिक
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

पॅनल
देणे आहे



भंडारी
"शुभकार्यासाठी शुभवस्त्रखरेदी"
शेरवाणी । कुर्तापायजमा । ब्लेजर । जोधपुरी
पैठणी । घागरा । शालु । कांजीवरम । प्युअरसिल्क । डिजायनर साडीज्
मेनरोड कॉर्नर, संगमनेर

# महेश नागरी पतसंस्थेच्या चेअरमनपदी

## सी. ए. कैलास सोमाणी तर व्हा.चेअरमनपदी राजेश लड्ढा



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर शहरातील अग्रगण्य महेश नागरी सहकारी पतसंस्थेच्या चेअरमनपदी सी.ए. कैलास सोमाणी तर व्हा. चेअरमनपदी राजेश लड्ढा यांची बिनविरोध निवड सहकार खात्याचे अधिकारी आर. एस. वाकचौरे यांच्या उपस्थितीत नुकतीच पार पडली .

मावळते चेअरमन दिनेश सोमाणी व्हा. चेअरमन संतोष चांडक संचालक अनिल अट्टल, योगेश जाजू, श्रीकांत मणियार, सौ. ज्योती कासट, विशाल नावंदर, अनिल कलंत्री, निलेश बाहेती, योगेश रहातेकर, मोरेश्वर कोथमिरे, सुदर्शन लाहोटी व व्यवस्थापक दिगंबर आडकी आदी मान्यवर उपस्थित होते.

महेश पतसंस्था ही अहील्यानगर जिल्ह्यातील अग्रगण्य पतसंस्था असुन एकुण व्यवसाय रु.२६२ कोटी आहे. अत्यंत स्पर्धात्मक दराने गतिमान व सुलभ कर्जवाटपाबाबत संस्थेचा नावलौकिक आहे. थकबाकी अत्यल्प असुन सभासदांसाठी वैद्यकीय मदत, सातत्याने १५% डिव्हीडंड, दीपावली भेट, ज्येष्ठ सभासदांसाठी १०% व्याजदराची ठेवयोजना, सभासदांच्या मुलींसाठी गिफ्ट बॉंड अशा अनेक नावीन्यपूर्ण योजना संस्थेतर्फे राबविल्या जातात.

निवडप्रसंगी मनोगत व्यक्त करताना पाचव्या वेळी चेअरमन पदी निवड झालेले चेअरमन सीए कैलास सोमाणी यांनी सन २०२५-२६ च्या आर्थिक वर्षात चांगल्या कामगिरीबद्दल गतवर्षीचे चेअरमन दिनेश सोमाणी व्हा.चेअरमन संतोष चांडक यांचे अभिनंदन केले.येणाऱ्या काळात बदलत्या अर्थव्यवस्थेत ग्राहकांना संस्थेमार्फत उत्तमरीत्या व वेगवान सेवा सुविधा देण्याचा आमचा प्रयत्न राहील.संस्थापक चेअरमन स्व.मोहनलालजी मणियार यांनी २२ वर्षांपूर्वी लावलेल्या रोपाच्या आज वटवृक्षात रुपांतर झाले आहे. नूतन व्हा.चेअरमन राजेश लड्ढा (प्रतिथयश व्यापारी, संगमनेर)यांनी कर्ज प्रक्रियेत सुलभता करण्यासाठी, तसेच स्वनिधी वाढवण्यास भर दिला जाईल, असे सांगितले सदर सभेत संस्थापक संचालक डॉ शशिकांत पोफळे व अनिल अट्टल यांनी संस्थेच्या गतिमान व पारदर्शी कारभाराच्या बळावर कामकाजात सतत लक्ष देऊन पुढे प्रगतीची घोडदौड अशीच चालू राहावी,अशा शुभेच्छा व्यक्त केल्या.तसेच संस्थेचे संचालक आनंद तापडे, नानासाहेब शेरमाळे, सौ. सरला आसावा व जयप्रकाश भुतडा यांनी नूतन चेअरमन सी.ए. कैलास सोमाणी व्हा. चेअरमन राजेश लड्ढा यांचे अभिनंदन केले. याप्रसंगी मावळते चेअरमन दिनेश सोमाणी व व्हा.चेअरमन संतोष चांडक यांनी सर्व संचालकांनी केलेल्या सहकार्याबद्दल आभार मानले.

नूतन पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करण्यासाठी मोठ्या प्रमाणात सभासद व मित्रपरिवार उपस्थित होता.या निवडीचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

पान १ वरून

# छत्रपती...

या सोहळ्यात गुरुशरणानंद महाराज, स्वामी अवदेशानंद, गोविंद गिरी महाराज, साध्वी ऋतुंबरा देवी आणि धीरेंद्र शास्त्री यांच्या हस्ते शिलान्यास झाला. बागेश्वर महाराजांनी आपल्या भाषणात दावा केला की, छत्रपती शिवाजी महाराज समर्थांकडे गेले आणि म्हणाले की आपण खूप युद्धे लढलो, आता हे राज्य तुम्हीच सांभाळा. काही दिवस मला काहीच करायची इच्छा नाही. त्यावर समर्थांनी राज्य चालवण्याचे मान्य केले, पण ते राजांच्याच आदेशानुसार असेल असे सांगितले.

केवळ ऐतिहासिक संदर्भच नव्हे, तर महाराजांनी उपस्थित हिंदूंना दिलेला सल्लाही वादग्रस्त ठरत आहे. हिंदूंनी चार मुलांना जन्म द्यावा आणि त्यातील एक मूल राष्ट्रीय स्वयंसेवक संघासाठी समर्पित करावे, असे विधान त्यांनी केले. लोकसंख्या नियंत्रणावरून देशात राजकीय खडाजंगी सुरू असताना, एका धार्मिक व्यासपीठावरून असे आवाहन करणे कितपत योग्य आहे, असा सवाल आता उपस्थित केला जात आहे.

# संगमनेर तालुक्यातील दोन जिल्हा परिषद शाळांची 'आदर्श शाळा' योजनेसाठी निवड

## आ. खताळ यांच्या पाठपुराव्याला यश



**ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनाही शहरी भागातील विद्यार्थ्यांप्रमाणेच उच्च दर्जाच्या शिक्षण सुविधा मिळाव्यात, हा आमचा ठाम उद्देश आहे. जिल्हा परिषद शाळांबद्दल पालकांचा विश्वास अधिक दृढ व्हावा, तसेच विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानासह गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे यासाठी आम्ही सातत्याने प्रयत्न करत आहोत. चंदनापुरी आणि तळेगाव दिघे येथील शाळांची निवड ही त्या दिशेने टाकलेले महत्त्वाचे पाऊल आहे. पुढील काळात संगमनेर तालुक्यातील आणखी शाळांचा या योजनेत समावेश व्हावा यासाठी आम्ही शासनाकडे पाठपुरावा सुरू ठेवणार आहोत, जेणेकरून प्रत्येक ग्रामीण विद्यार्थ्याला सक्षम आणि स्पर्धात्मक शिक्षण मिळू शकेल.**

**आ. अमोल खताळ, संगमनेर**

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार आणि आधुनिक शिक्षण सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हा परिषद शाळांमध्ये पायाभूत आणि भौतिक सुविधांचा विकास करण्याच्या दृष्टीने आमदार अमोल खताळ यांनी राज्य शासनाकडे सातत्यपूर्ण पाठ पुरावा केला होता. या प्रयत्नांना अखेर यश आले असून राज्य शासनाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा विकसित करणे या महत्त्वाकांक्षी योजनेतर्गत संगमनेर तालुक्यातील चंदनापुरी आणि तळेगाव दिघे येथील जिल्हा परिषद शाळांची निवड करण्यात आली आहे.

राज्य शासनाने जिल्हा परिषदांच्या शाळांना 'आदर्श शाळा' म्हणून विकसित करण्याचे धोरण जाहीर केले होते. त्या अनुषंगाने राज्याचे शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी २७ मार्च २०२६ रोजी शासन निर्णय प्रसिद्ध केला.या निर्णयानुसार पहिल्या टप्प्यात राज्यातील एकूण ४७८ शाळांना आदर्श शाळा म्हणून विकसित करण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यामध्ये संगमनेर तालुक्यातील चंदनापुरी व तळेगाव दिघे येथील जिल्हा परिषद शाळांचा समावेश झाल्याने तालुक्यात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

या योजनेअंतर्गत निवड झालेल्या शाळांमध्ये आधुनिक वर्गखोल्या, स्वच्छता सुविधा, डिजिटल शिक्षण साधने, क्रीडांगणे तसेच इतर आवश्यक भौतिक सुविधा विकसित केल्या जाणार आहेत. यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शहरांप्रमाणेच दर्जेदार शिक्षण मिळण्यास मोठी मदत होणार आहे.

# शिवसेना ठाकरे गटाकडून संगमनेरमध्ये भव्य जनसेवा शिबिराचे आयोजन

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या जनशताब्दी वर्षानिमित्त संगमनेर शहरातील शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या यांच्या वतीने भव्य जनसेवा शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. जनसामान्यांना विविध शासकीय योजनांचा लाभ एकाच ठिकाणी मिळावा या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

शिवसेनाप्रमुखांच्या ८० टक्के समाजकारण आणि २० टक्के राजकारण या विचारधारेनुसार आयोजित करण्यात आलेल्या या शिबिरात नागरिकांना विविध शासकीय सेवा व मार्गदर्शन उपलब्ध करून दिले जाणार आहे. या शिबिरामध्ये मतदान कार्ड (नवीन व दुरुस्ती), आधार कार्ड मार्गदर्शन, आभा (डिजिटल हेल्थ) कार्ड, आयुष्मान भारत योजनेअंतर्गत कार्ड (५ लाखांपर्यंत मोफत उपचार), पॅन कार्ड नोंदणी, रेशन कार्ड मार्गदर्शन तसेच विविध शासकीय योजनांचे सविस्तर मार्गदर्शन व मॅपिंग सुविधा उपलब्ध असणार आहेत. हे शिबिर रविवार, दिनांक २६ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ९ ते सायंकाळी ५ या वेळेत अलका नगर, जुना जोर्वे पूल परिसर, संगमनेर येथे आयोजित करण्यात आले आहे.

सर्व नागरिकांनी आपल्या आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहून या शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे. या उपक्रमाचे आयोजन संगमनेर शहर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने करण्यात आले असून, शहर प्रमुख फैसल सय्यद यांनी नागरिकांना मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

INVOFIX SOLUTION PVT. LTD.
साठी खालील जागा भरणे आहे
JOB VACANCY
मार्केटिंग - १० जागा
टेली कॉलिंग - १० जागा
सेल्स ऑफिसर - ०५ जागा
ड्रायव्हर - ०२ जागा
अनुभवास प्राधान्य आकर्षक पगार दिला जाईल
- पत्ता - श्री स्वामी समर्थ एजन्सी, स्वागत मंगल कार्यालयासमोर अकोले बायपास रोड संगमनेर
- संपर्क - 7030334486 7030334494

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी
आर्थिक अडचण आहे का?
काळजी करु नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
SMBT BANK
* कर्ज रक्कम वाढ । * कर्ज व्याजदर कमी । * कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड, तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु।।, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता

चैतन्य हॉस्पिटल
डॉ. जठार हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
डायलिसीस | सुसज्ज ऑपरेशन थिएटर | सीटी स्कॅन
सोनोग्राफी, २डी इको, एक्स रे | अत्याधुनिक लॅब | अत्याधुनिक आयसीयु
०२४२५ - २२४७६२, मोबा. ७०३८२७०३८२

अविवाहित, नवविवाहित, चाळीशिनंतरच्या, लठ्ठ, मधुमेह, थायरॉईड, PCOD सारखे हार्मोनल डिफेक्ट असलेल्या
स्त्रियांच्या समस्या
मासिक पाळीच्या तक्रारी | योनी मार्गाची दुर्गंधी
अंगावरून पांढरे जाणे | गुप्त अंगाला खाज
गर्भ न रहाणे | विविध त्वचा विकार
वारंवार गर्भपात होणे | गुप्तरोग, गर्मी
गर्भाशयात गाठी | लघवीला जळजळ
गर्भाशयाचा कर्करोग | संभोगात रस न येणे
स्तनांची वाढ न होणे | संभोगा विषयीची भीती
स्तनातून दूध न येणे | हस्तमैथूनाची सवय
स्तनात गाठी | लैंगिक विकृती
स्तनाचा कर्करोग | मानसिक नैराश्य
डॉ. मोना अभय मुथा B.H.M.S., C.G.O., D.Ac होमिओपॅथिक कन्सल्टंट स्त्री रोग चिकित्सक (३० वर्षांचा प्रदीर्घ अनुभव)
1 लाखांहून अधिक महिलांचा यशस्वी उपचार | ISO मानांकन प्राप्त
डॉ. मुथाज् होमिओपॅथिक क्लिनिक विनायकनगर, नगर - पुणे रोड, अहिल्यानगर
www.homoeopathictreatment.in 91 30 30 90 13

दर्शन टेक्सटाईल मार्केट
सेल नव्हे होलसेल सेल
मान्सून ऑफर
30% ते 70% डिस्काउंट
शालू | कांजीवरम | सिल्क पैठणी | बनारसी
संपर्क : 8390005001
जाणता राजा मार्ग, आय.डी.बी.आय बँक समोर, संगमनेर 422605

स्वास्थ्य रक्षणाय् रोग परिश्रमनाय
कुटे हॉस्पिटल अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist
डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist
डॉ. निखील रहांगडाले Orthosurgeon
डॉ. सुनिल दिघे Cardiologist
डॉ. फैमुद्दीन शेख Medicine
• सर्जरी विभाग • डायलिसीस विभाग • हृदयरोग विभाग • जॉईंट रिप्लेसमेंट
• अतिदक्षता विभाग • सुपर स्पेशालिटी विभाग • मेडिसीन विभाग • स्पाईन सर्जरी
• अपघात विभाग • न्यूरोविभाग • अद्ययावत कॅथलॅब • मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना ॲम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा 8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर (०२४२५) २२६६८८, २२६६८६

दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर–४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर – ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायक्षेत्र) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25